|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : १३ सोमवार दि. १८ मार्च २०२४ ते रविवार दि. २४ मार्च २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## चारित्र्याच्या संशय प्राणावर बेतला चिडलेल्या पतीने पत्नीचा जीव घेतला

नागपूर/क्राईम रिपोर्टर

पती संशयी असला की कुणाचाही संसार सुखाचा होत नाही. माणसाच्या मनात एकदा का संशय निर्माण झाला की संशयातून त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि हीच सुडाची भावना त्याला कोणत्याही थराला नेते. नागपूर नजीकच्या भिवापूरमध्ये अशाच एका घटनेत चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी पतीसह सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल केला आहे.

पती आणि पत्नीच्या नात्याला काळिमा फासणारी ...पान ६ वर

# कर्जाच्या ओझ्यामुळे व्यावसायिकाची शोकांतिका झाली पत्नी आणि तरुण मुलाचा जीव घेऊन आत्महत्या केली



मयत श्रीनिवास इंडूपुगंटी



मयत श्रीपद्मलता इंडूपुगंटी



मयत चंद्रशेखर इंडूपुगंटी

नागपूर/क्राईम रिपोर्टर

**ग्रामीण भागात जी अवस्था शेतकऱ्यांची आहे तीच अवस्था छोट्या छोट्या उद्योजकांची सुद्धा आहे. खास करून शेती व्यावसायाशी संबंधित असलेले जे उद्योग आहेत त्यांची परिस्थिती खूप बिकट आहे. कारण एकीकडे कर्ज काढून धंदा सुरू करायचा आणि तो चालला नाही की त्या धंद्यासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडत बसायचे, अशी अवस्था ग्रामीण भागातील शेतकरी असो किंवा छोटे व्यापारी असोत, सर्वांची अशीच स्थिती आहे. महाराष्ट्रात आजवर ३८ हजार कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तर कर्जात बुडालेल्या ४ ते ५ हजार छोट्या आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे या छोट्या व्यावसायिकांना वाचवायचे असेल तर त्यांना सरकारकडून मदत मिळायला हवी, त्यांनाही कर्जमाफी मिळायला हवी! तरच ग्रामीण भागातले व्यवसाय आणि छोटे व्यावसायिक जगतील. अन्यथा कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या या छोट्या व्यावसायिकावरसुद्धा अशीच आत्महत्या करण्याची पाळी येत आहे. पण आत्महत्या हा काही कर्जबाजारी असण्यावर टोकाचा उपाय नाही आत्महत्येमुळे प्रश्न सुटत नाहीत, तर निर्माण होतात. कारण कर्जबाजारी माणसाने आत्महत्या केली तर तो संपतो, पण त्याच्या कुटुंबाच्या समोर मात्र अडचणींचा डोंगर उभा रहातो. नागपूर जिल्ह्यातील निमखेडा येथे एका राईस मिलवाल्यावर बँकेचे कर्ज होते, पण त्याचा हा व्यवसाय चालत नव्हता. त्यामुळे त्यांनी इतरांकडून तसेच बँकेकडून कर्ज घेतले होते, पण कर्जाचे हप्ते वेळेवर जात नसल्याने कर्जाच्या वसुलीसाठी कर्ज देणाऱ्याने तगादा लावला होता, याच तगाद्याला कंटाळून त्याने पत्नी व मुलाची हत्या करून आत्महत्या केली, या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.**



पत्नी व मुलाची गळा आवळून हत्या केल्यानंतर राइस मिल संचालकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही थरारक घटना मौदा तालुक्यातील अरोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील निमखेडामधील शांतीनगर येथे गुरुवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेने पोलिसांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. श्रीनिवास इंडूपुगंटी (वय ५८), श्रीपद्मलता श्रीनिवास इंडूपुगंटी (वय ५५) आणि चंद्रशेखर श्रीनिवास इंडूपुगंटी (वय २७), अशी मृतकांची नावे आहेत. श्रीनिवास यांचे दुमजली प्रशस्त घर आहे. पहिल्या माळ्यावर ते पत्नी, मुलगा व सून चांदनी यांच्यासोबत राहायचे. तर तळ मजल्यावर श्रीनिवास यांचे सासू सासरे राहतात. बुधवारी रात्री सर्वांनी जेवन केले. त्यानंतर श्रीनिवास त्यांच्या पत्नी श्रीपद्मलता या खोलीत झोपायला गेले. चंद्रशेखर हा त्याच्या खोलीत झोपला. अन्य एका खोलीत चांदनी या टीव्ही बघत होत्या. रात्री ११ वाजताच्या सुमारास त्या तेथेच झोपी गेल्या. यादरम्यान श्रीनिवास यांनी दोरीने पत्नीचा गळा आवळून खून केला. त्यानंतर उशीने त्यांचे तोंड दाबले. श्रीनिवास हे चंद्रशेखर याच्या खोलीत गेले. त्याचाही अशाचप्रकारे खून केला व खोलीत परतले. लोखंडी गजाला दोरी बांधून श्रीनिवास यांनी आत्महत्या केली. सकाळी ६.00 वाजताच्या सुमारास चांदनी यांना जाग आली. त्या खोलीत ...पान २ वर

# पहिल्याच दिवशी ठेवला पैशावर डोळा नोकराने आवळला मालकिणीचा गळा








मुंबई/एस.कुमार

**नोकर ठेवताना त्याची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक असते. कारण मुंबईत एकाकी रहाणाऱ्या काही ज्येष्ठ नागरिकांची यापूर्वी नोकरांनीच हत्या केल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे मुंबई पोलिसांनी नोकर ठेवणाऱ्यांना अनेक वेळा अलर्ट केले होते. पण मलबार हील मधील एका व्यापाऱ्याने त्याच परिसरात राहाणाऱ्या एका सुरक्षा रक्षकांच्या मुलाला विश्वासाने कामाला ठेवले आणि त्याने पहिल्याच दिवशी मालकिणीला ठार मारून दागिने लुटले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

नेपियन्सी रोड या उच्चभ्रू परिसरातील तहनी हाईटस या इमारतीच्या २०व्या मजल्यावरील सदनिकेत मुकेश शहा हे पत्नी ज्योती शहा आणि एका मुलीसह राहतात. मुकेश शहा यांचे ट्रायटंड हॉटेलात सोने चांदीच्या दागिने विक्रीचे दुकान आहे. दुपारी जेवण वैगरे करून मुकेश शहा हे दीड वाजता मुलीसह दुकानात निघून गेले. घरात फक्त त्यांची पत्नी ज्योती आणि नोकर कैन्हयाकुमार पंडीत हे दोघेच होते. त्यामुळे भीती बाळगण्याची काही आवश्यकता नव्हती. पत्नी ज्योती घरात एकटी असल्याने मुकेश आणि त्यांची मुलगी दोघेही अधून मधून फोन करत असत. दि. १२ मार्च रोजी संध्याकाळी मुलीने नेहमी प्रमाणे आई ज्योती यांना मोबाईल फोन केला पण मोबाईलची रिंग वाजता होती.तो तिने उचलला नाही. मुलीला संशय आला. त्यामुळे तिने घरातील लॅन्डलाईन नंबरवर दूरध्वनी करून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण दूरध्वनी उचलला गेला नाही. त्यामुळे ती आणखीनच घाबरली. मग तिने शेजारच्या मुलीला फोन केला आणि माझी आई फोन उचलत नाही जरा घरी जाऊन आईला बघून ये असे सांगितले. शेजारील मुलगी ज्योती शहा यांना बघायला गेली असता घराचा दरवाजा बंद असल्याचे आढळून आले. समोरील मुलीने शहा यांच्या मुलीला फोन करून ही माहिती दिली. तातडीने मुकेश शहा हे मुलीसह घरी आले. त्यांनी ड्युप्लिकेत चावीने घराचा दरवाजा उघडून पाहिले असता, ज्योती बेशुद्धावस्थेत आढळल्या. त्यांना लगेच रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. लगेच या घटनेची माहिती मलबार हिल पोलिसांना देण्यात आली.वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह शिंगाडे हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी लगेच ही माहिती अपर पोलीस आयुक्त ...पान ६ वर


## मुलावरचा राग बापावर काढला रागाच्या भरात मुडद्दाच पाडला

कराड/क्राईम रिपोर्टर

**कोणतीही महिला ही त्या कुटुंबाची अब्रू असते. अशावेळी तिच्याशी कुणी गैरवर्तन केले किंवा तीला फसवून तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला तर त्या महिलेच्या कुटुंबातील लोक त्याला सोडत नाहीत. असाच काहीसा प्रकार सौदापुरमध्ये घडला. उसाच्या गुऱ्हाळावर काम करणाऱ्या एका ड्रायव्हरने तिथल्याच एका विवाहितेला पळवून नेले, याचा तिच्या कुटुंबातील विजय नावाच्या इसमाला इतका राग आला की त्याने अक्षय याच्या कुटुंबावर हल्ला केला. या हल्ल्यात अक्षयच्या वडिलांचा मृत्यू झाला, तर आई आणि भाऊ जखमी झाला. या प्रकरणी विजय जाधव याला अटक करण्यात आली आहे.**

खटाव तालुक्यातील बाबा आळवंत मदने हे कराड येथील सैदापुर मधील अंबक वस्ती मध्ये आपल्या दोन पत्नी आणि मुलासह राहयला आहेत. ते सर्व जण अंबक वस्तीवरील संतोष देसाई याच्या गुऱ्हाळ घरात काम करीत असतात.तेथेच ते एका झोपडी वजा घरात राहून आपला कामधंदा करीत होते. त्याचा मोठा मुलगा त्याच गुऱ्हाळ घरातील एका ट्रॅक्टरवर ड्रायव्हर म्हणून काम करीत होता. तो ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना त्याने त्याच वस्तीवरील एका विवाहितेला पळवून नेले.या दरम्यान त्या विवाहितेच्या नातेवाईकांना अक्षय याचा राग येणे स्वभाविक होते. अक्षयने त्या विवाहितेला ...पान २ वर

# प्रेमभंग होताच प्रियकर भयंकर पेटला प्रेयसीला ठार मारून सूड त्याने घेतला








जत/क्राईम रिपोर्टर

**प्रियकर प्रेयसीचे प्रेम हे केवळ शारीरिक नसते तर त्या प्रेमात भाव भावनांची गुंफण असते. विश्वासाचे अतूट नाते असते आणि मुख्य म्हणजे परस्परांसाठी कोणताही त्याग करण्याची तयारी असते, पण काही तरी तरुणीचे कुटुंबीय जुन्या रुढीचे असते. त्यामुळे हलक्या जातीतील मुलाशी आपल्या मुलीने प्रेम केलेले त्यांना आवडत नाही. ते मुलीवर दबाव टाकतात आणि पालकांच्या दबावापुढे तरुणी सुद्धा हतबल होते. जत शहरातील शेगाव मार्गावर रहाणारी अक्षता हिचेही तसेच झाले. तिचे एका दलित मुलावर प्रेम होते. पण अक्षताच्या कुटुंबीयांनी तिचे लग्न दुसरीकडे ठरवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे चिडलेल्या प्रियकराने अक्षता हिला ऐकांतात नेऊन तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात अपयश येताच त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

जत शहरातील शेगाव रस्त्यावरील मळ्यात सदाशिव कोरे हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. जत शहरापासून तीन किमी अंतराव राजे रामरामराव महाविद्यालय असून येथे जत परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शेगाव रोड वरील सदाशिव कोरे याची अक्षता ही मुलगी याच कॉलेजमध्ये बी.ए.च्या पहिल्या वर्गात शिक्षण घेत ...पान २ वर

## शुल्लक कारणावरून बाईकस्वारांनी राडा केला निरपराध अश्विनी कुमार मात्र फुकटचा मेला

सांगली/क्राईम रिपोर्टर

**आजकाल शुल्लक कारणावरून लोक इतके चिडतात की एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पहात नाहीत. सांगलीमध्ये एकाने बाईक वरून जाणाऱ्या दोघांना इथून जावू नका, मागच्या बाजूने जा असे सांगितले बस्स! एवढ्याशा शुल्लक कारणावरून त्या बाईकस्वारांनी अश्विनी कुमार नावाच्या इसमाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

जिल्हा खुनाच्या घटनेने पुन्हा एकदा हादरला आहे. जतमधील खुनाची घटना ताजी असतानाच सांगली शहरांमध्ये पुन्हा एका गुन्हेगाराचा खून करण्यात आला आहे. अश्विन कुमार मल्हारी मुळके असे मयत गुन्हेगाराचे नाव आहे. तर या हल्ल्यात गणेश महादेव हाताळे हा गंभीर जखमी झाला आहे. अश्विन कुमार मल्हारी मुळके हा नवीन वसाहतमध्ये राहण्यास आहे. गुरुवारी मध्यरात्री तो घराजवळ थांबला होता. त्यावेळी तेथून कुणाल पवार आणि विकी पवार हे दोघे दुचाकीवरून निघाले होते. यावेळी अश्विन कुमार मुळके याने या भागातून दुचाकी जात नाही, तुम्ही पाठीमागून जा, असे सांगितले. यावेळी दोघांनी तू कोण सांगणार असे म्हणून त्याच्याशी वाद घातला. वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. त्या दोघांनी अजय खोत आणि सुजित चंदनशिवे या दोघांना घटनास्थळी बोलावून घेतले. दोघे आल्यानंतर वाद पुन्हा वाढला. परंतु वाद मिटवण्याचा प्रयत्न देखील झाला. याचवेळी एकाने अश्विन कुमार याच्यावर हल्ला ...पान ६ वर

## करणीच्या संशयामुळे भाचा संतप्त झाला रागाच्या भरात त्याने आत्याचा खून केला




सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

**शाहू-फुले-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात अंधश्रध्देला थारा नाही, तरीसुद्धा अंधश्रद्धेतून लोकांचे बळी जात आहेत. जारण-मारणं, जादू- टोना यातून नरबळी दिले जात आहेत. अंधश्रद्धेच्या विरोधात दाभोलकर यांच्यासारख्या समाज सुधारकांनी आयुष्यभर अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला, त्यामुळे जादू टोनाविरोधी कायदा अस्तित्वात आला. मात्र त्याची अंमबजावणी होत नसल्याने आजही अंधश्रद्धेतून निरपराधांचे बळी जात आहेत. सोलापूर जिल्ह्यातील शीरभावी गावात आत्या आपल्यावर करणी करते या संशयातून भाच्यानेच आत्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

अकरा मार्च रोजी सात वाजण्याच्या सुमारास मौजे शीरभावी, ता. सांगोला गावाचे लगत असलेल्या वन विभागाच्या जागेत एका अंदाजे साठ वर्षीय महिलेचा मृतदेह दगडाने व धारदार शस्त्राने वार करुन खुन केलेल्या आवस्थेत मिळुन आला होता. सदर बाबत सांगोला पोलीस ठाणे गुरंन २१७/२०२४ भादवि क ३०२, २०१ अन्वये दि. ११ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ...पान ६ वर

## लंपट म्हातारा वासनेने बेभान झाला मुलींवर हात टाकताच तुरुंगात गेला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर



**काही लोक इतके वासनांध असतात की त्यांना स्वतःच्या वयाचे सुद्धा भान नसते. त्याचबरोबर त्यांची वासना विकृतित बदलल्यावर त्यांना आपल्या पेक्षा वयाने कितीतरी लहान असलेल्या मुलींचे आकर्षण वाटू लागते. अहमदनगर जिल्ह्याच्या बेल्हेकर वाडीत चर्चमध्ये सुरक्षा रक्षक असलेल्या एका ८४ वर्षाच्या म्हाताऱ्याने दोन अल्पवयीन मुलींशी अश्लील चाळे केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी म्हाताऱ्याला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे.**

अहमदनगरजिल्ह्याच्या नेवासा तालुक्यातीलसोनई बेल्हेकरवाडी रोडवरील एका गिरीजाघराच्या (चर्च) प्रांगणामध्ये वॉचमन म्हणून काम करणाऱ्या, ज्येष्ठ नागरिक असलेल्या नराधमाने त्याच्या नातीच्या वयाच्या मुलीसोबत अश्लिल चाळे केल्याची माहिती पुढे आली. त्यापाठोपाठ तो नराधम त्या मुलीसोबत गैरकृत्य करत असतांनाची चित्रफीत व्हायरल झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. 'माणुसकीला, माणूसपणाला काळीमा फासणाऱ्या या घटनेने मन अस्वस्थ झाले. संबंधित अल्पवयीन मुलींना चॉकलेटचे आमिष दाखवून चर्च परिसरात बोलावून अश्लिल चाळे ...पान २ वर

# ठरणार होता म्हातरपणीचा आधार दारुसाठी मुलाने केले आईला ठार

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



**'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला ती जगाला उध्दारी' असे म्हटले जाते. पण जगाला उद्धारणारी ही माता आपल्याच घरात आपल्याच रक्ताच्या लोकांकडून सुरक्षित नसल्याचे आज दिसून येते. ज्याला ९ महिने पोटात वाढवले काबाड कष्ट करून लहानाचे मोठे केले तोच तिच्यासाठी कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरतोय. बुलढाणा जिल्ह्यातील दोन गाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका इसमाने दारुसाठी आपल्या जन्मदात्या मातेची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



मुलाचा जन्म हा प्रत्येक आई बापासाठी आनंदाचा सोहळा असतो. आपले मूल आपला आधार बनेल अशी अपेक्षा सर्वच माता- पित्यांची असते. ते मुलासाठी काबाडकष्ट उपसतात, त्याला मोठे करतात, शिकवून शहाणे करतात. सगळीच मुले चांगली निघतात असे नाही. काही मुले इतकी वाईट निघतात की त्याला जन्म देऊन चूक केली असा पश्चाताप आई-वडीलांना वाटतो. बुलढाणा जिल्ह्यात एका घरातील तिसऱ्या क्रमांकाच्या मुलाने साऱ्या घरादाराचा छळ मांडला होता. लग्न होऊन दोन मुले झाली तरी तो सुधारला नाही. तिशी पार केलेला व दोन मुलांचा बाप असलेला हा तरूण आई-वडीलांकडे दारूसाठी पैसे मागत असे. पैसे नाही दिले तर मारहाण करत असे. हा प्रकार इतका वाढला की त्याने दारूला पैसे दिले नाहीत या रागातून जन्मदात्या आईचा निर्घृण खून केला. मेहकर तालुक्यातील डोणगाव ...पान ६ वर

18 TO 24 MARCH 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/16/2024 8:14 PM Page 1



## पान १ वरून...

### कर्जाच्या बोझ्यामुळे व्यावसायिकाची ...

गेल्या असता चंद्रशेखर हे मृतावस्थेत दिसले. चांदनी या श्रीनिवास यांच्या खोलीत गेल्या असता दोघेही मृतावस्थेत होते. याचा जबर धक्का चांदनी यांना बसला. त्यांनी आरडाओरड केली. श्रीनिवास यांचे सासूसासरे पहिल्या माळ्यावर आले. शेजारी जमले. एका नागरिकाने अरोली पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यासह पोलिसांचा प्रचंड ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून पोलिसांनी तिघांचे मृतदेह हॉस्पिटलकडे रवाना केले. याप्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### मुलावरचा राग बापावर काढला...

पळवून नेल्यावर त्या विवाहितेचा नातेवाईक विजय जाधव याला अक्षयचा राग आला. त्याला कधी एकदा अक्षयचा बदला घेतो असे झाले.बुधवार दि.१४ मार्च च्या रात्री विजय हा फुल्ल दारू पिऊन वस्तीवर आला. तो अक्षय राहत असलेल्या झोपडीजवळ येऊन त्याला व त्याच्या बाबाला आईला शिवीगाळ करीत होता. त्याचवेळी कोण आपल्याला शिवीगाळ करीत आहे म्हणून अक्षयची आई, बाबा आणि त्याचा धाकटा भाऊ बाहेर आले. रागाच्या भरात असणाऱ्या विजय जाधव याने मागचा पुढचा विचार न करता अक्षयच्या आई बाबा आणि त्याचा धाकटा भाऊ याचेवर आपल्याकडील धारदार चाकूने सपासप वार केले. यात अक्षयचे वडिल बाबा मदने याचा मृत्यू झाला. तर त्याची पत्नी आणि धाकटा मुलगा गंभीर रित्या जखमी झाले.या घटनेनंतर घटनास्थळावरून विजय जाधव हा पळून गेला. खूनाची ही घटना कराड शहर पोलीसांना समजताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. अक्षय मदने हा गुऱ्हाळ घरातील मालकाच्या ट्रॅक्टरवर ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना त्याची नजरा नजर त्या गुऱ्हाळ घरात काम करणाऱ्या रेणु (काल्पनीत नाव) हिच्याबरोबर होत होती. रेणु ही विवाहिता असली तरी तिची कमसीन जवानी चार लोकात उठून दिसणारी अशी होती. तिचा नवरा तिला सोडून दुसरीकडे काम करीत होता. तर तिच्या नात्यातील दुसरे नातेवाईकांच्या सोबत ती त्या गुऱ्हाळ घरात काम करीत होता. तिला त्यावेळी नात्यातील नातलगाचा अधार होता. तशी ती चालूच होती.काम करीत असताना अक्षय दिसला की ती त्याला लाईन देत असायची.त्यामुळे अक्षय ही तिला खुणवाखुणवी करीत होता. त्याचा हा प्रेमलाप बरेच दिवस चोरून चालत होता. त्यामुळे वस्तीवरील इतर लोकांना त्याच्या त्या संबंधाबाबत काहीच थांगपत्ता लागला नाही. नेमके याचा गोष्टीचा फायदा घेत ते दोघे चोरून भेटत होता. या भेटीत अक्षय तिला काय पाहिजे काय नको ते पाहत होता. तिने एखादी गोष्ट मागितली किंवा तिने त्याच्याकडे पैसे मागितले तर अक्षय तिला लागलीच देत होता. दोघांनी ही एकमेकांच्या नजरेतील भाव ओळखल्याने दोघांना ही जवळ यायला वेळ लागला नाही. ती नवऱ्यापासून लांब राहत असल्याने तिला कशाची गरज आहे हे अक्षयने ओळखले होते. रात्रीच्या वेळी दुसऱ्याची नजर चुकवून अंधाराचा फायदा घेत अक्षय तिच्या झोपडीत शिरत होता. तर कधी कधी ती ही शौचाचा बहाणा करीत रात्रीच्या अंधारात ती त्याला भेटायला जात होती. तेथे दोघांचे मनोमीलन हे ठरलेले असायचे. २२ वर्षी रेणूची जवानी उपभोगताना अक्षयने कोणतीच कसर सोडली नाही. तिने ही चमडी देवून त्याच्याकडून दमडी काढली असल्याने तो मागेल त्यावेळी ती त्याला सेक्स करायला देत असायची त्यातून दोघांची ही गरज पुर्ण होत असल्याने दोघांना ही त्याचे सोयर सुतक नव्हते. अलकिडे तर ती अक्षयलाच आपला नवरा मानत होती. तिचा नवरा जवळ नसल्याने तिची ती गरज अक्षय पुर्ण करीत असल्याने ती त्याच्या प्रेमात आकंड बुडाली. अक्षयला ही मनापासून ती आवडत असल्याने त्याने ही तिच्या प्रेमात कोणतीच कसर सोडली नाही. याच संधीचा फायदा घेत रेणू ही अक्षयला लग्न करण्यासाठी तगादा लावू लागली. खरे तर रेणु ही एक विवाहिता असल्याने अक्षयच्या घरचे लेक त्याच्या लग्नाला कबुल होणार नव्हते हे अक्षयला माहित होते. एकीकडे तो घरच्यांना दुखवू शकत नव्हता. तर दुसरीकडे रेणूचे मन ही मोडू शकत नव्हता. यातून त्या दोघांनी ही वेगळाच मार्ग काढला. मागील आठ पंधरा दिवसाच्या मागे त्याने वस्तीवरील लोकांना काही ही समजू न देता रेणूला पळवून नेले. पळवून नेऊन त्याने तिला कुठे ठेवले याचा त्याने कोणाला अंदाज दिला नाही. रेणू वस्तीवर दिसत नाही आणि त्याच बरोबर अक्षय मदने ही वस्तीवर दिसत नाही त्यामुळे वस्तीवर त्या दोघांच्या संबंधाची चर्चा होऊ लागली. याच गुऱ्हाळ घरात रेणूचा चुलत दीर विजय धर्मा जाधव हा मजुर म्हणून काम करीत होता. त्याला या आगोदर त्या दोघांच्या संबंधाची कल्पना नव्हती. परंतु जशी गुऱ्हाळ घरात ही चर्चा होऊ लागली. तसे त्याच्या डोक्यात त्या दोघांच्या संबंधाची भणक लागली. रेणू ही अक्षयबरोबर कशी जवळीकता ठेवून वागत होती, बोलत होती याची त्याला आता कल्पना आली.तर अक्षयने ही वस्तीवर राहून आपल्या भावाच्या बायकोला कसे नादाला लावले हे ही त्याच्या ध्यानात आले. त्यामुळे तो अक्षयवर राग धरून होता. त्याने रेणुला पळवून नेल्याने त्याची नातेवाईकांत इज्जत अब्रु गेली होती. ही घटना घडल्यापासून तो रोज रात्री दारू पिऊन अक्षयच्या झोपडीजवळ येऊन त्याच्या घरच्या लोकांना शिवीगाळ करीत त्यांना धमकी देवून बघून घेण्याची भाषा करीत होता. अक्षयच्या आईने वडिलांनी आणि त्याच्या धाकटा भावाने विजय जाधव याला यातील आपल्याला काहीच माहित नसल्याचे सांगितले. तरी ही विजय याला त्याचे सांगणे पटत नव्हते. आपल्या वहिनीला अक्षयने फुस लावून पळवून नेण्यामागे त्याच्या घरच्या लोकांचा ही हात आहे असे वाटत होते. अक्षयने रेणूला पळवून नेवून कुठे ठेवले आहे हे त्याच्या घरच्या लोकांना नक्कीच माहित असणार परंतु ते आपल्याला काही थांगपत्ता लागू देत नाहीत. म्हणून तो त्याचेवर चिडला होता. त्यातच तो रोज रात्री दारू पिऊन येवून त्याच्या झोपडीसमोर शिव्या देत असायचा. ही गोष्ट बाबा मदने इंदु मदने यांनी गुऱ्हाळ घराचे मालक संतोष देसाई याच्या कानावर ही घातली.त्यांनी ही विजय याला चार गोष्टी समजावून सांगत गप्प राहण्यास सांगून आज ना उदया अक्षय आणि रेणू परत येतील जावून जावून ते दोघे कुठे जाणार आहेत असे सांगून पाहिले. तरी ही विजयच्या डोक्यातून अक्षयचा काही राग जात नव्हता. कधी एकदा अक्षयला गाठतो आणि त्याला मारतो असे त्याचे झाले होते. नात्याने वहिनीला त्याने पळवून नेले असल्याने तो मनातून फार दुखावला गेला. नेहमीप्रमाणे बुधवार दि.१४ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास विजय जाधव हा दारू पिऊन बाबा मदने याच्या झोपडीसमोर येवून त्याना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करू लागला. हे बघून बाबा मदने याची पत्नी इंदु मदने या रागा रागात आपल्याला शिव्या देणाऱ्या विजय याला शिव्या देत झोपडी बाहेर आल्या. आपल्याच वहिनीला पळवून नेऊन आपल्यालाच शिव्या देवू लागल्यावर त्याचे ही मस्तक फिरले. त्याचवेळी झोपडीच्या बाहेर शिव्या देत येणाऱ्या इंदु मदने याच्यावर विजय याने आपल्याकडील धारदार चाकूने वार केला. हा वार इंदु याच्या डाव्या हाताला लागला. त्यावेळी त्या जोरात ओरडल्या. त्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकून झोपडीत बसलेले बाबा मदने हे बाहेर पळत आले. ते ही पलत येताना विजय याला शिव्या घालत होते. ते येताच विजयला रागा चापारा चढला.समोर बाबा मदने येताच त्याने त्याच चाकूने त्याच्या पोटात सपासप वार केले.त्यासरशी ते रक्ताच्या थारोळ्यात तडफडत पडले.त्याचवेळी गुऱ्हाल घराच्या बाहेरील मोकळ्या जागेत थांबलेला त्याचा धाकटा मुलगा अजित मदने हा त्यांना सोडवायला आला असता त्याचेवर ही विजय जाधव याने चाकूचा वार केला. या वारात अजित मदने हा गंभीर जखमी झाला. गुऱ्हाळ घरातील वस्तीवर चाललेला गोंधळ बघून इतर लोक धावत पळत बाबा मदने याच्या झोपडीजवळ आले. विजय जाधव याच्या हातात रक्ताने माखलेला धारदार चाकू होता. तर घटनास्थळी रक्ताच्या थारोल्यात बाबा मदने हे पडलेले होते. वस्तीवरील लोकांनी तातडीने हालचाल करीत गंभीर जखमी असलेल्या बाबा मदने, इंदू मदने आणि अजित मदने यांना उपचारासाठी लागलीच एका खाजगी वाहनातून कऱ्हाड येथील कृष्णा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केला. तेथे उपचार सुरू असताना गुरूवारी सकाळी बाबा मदने याचा मृत्यू झाला.या घटनेची माहिती कऱ्हाड शहर पोलीसांना देण्यात आली. कऱ्हाड शहर पोलीसांनी अंबक येथील गुऱ्हाळ घरातील वस्तीवर भेट देवून घटना स्थळाचा पंचनामा केला. तर कृष्णा हॉस्पिटलमध्ये जावून गंभीर जखमी असणाऱ्या व उपचार घेत असलेल्या इंदु मदने आणि त्याचा धाकटा मुलगा अजित मदने याच्याकडे या घटनेची चौकशी केली. अजित मदने याने ही घटना कोणत्या कारणातून आणि कोणी केली याची माहिती पोलीसांना देवून तशी लेखी फिर्याद पोलीसात दाखल केली. आतापर्यत ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची कल्पना पोलीसांना समजली असल्याने त्यांनी परत घटनास्थळ गाठले. या घटनेनंतर विजय जाधव हा दुसऱ्या दिवशी घटनास्थळी दारू पिऊनच फिरत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. परंतु ज्यावेळी पोलीस तेथे गेले त्यावेळी तेथे तो पोलिसांना मिळून आला नाही तो सैदापुर जवळील शेणोली स्टेशन येथील आपल्या मुळ गावी गेल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना लागली. तेथे सापळा रचून पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कऱ्हाड पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता सुरूवातीला तो पोलीसांना उडवा उडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची कबुली दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने अजित मदने याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी कऱ्हाड पोलीसात बाबा आळवंत मदने (वय ५५) याच्या खून प्रकरणी आणि इंदु मदने आणि अजित मदने यांना गंभीर जखमी केल्या प्रकरणी विजय धर्मा जाधव (वय ५२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला कराड येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि मोटार सायकल जप्त केले. या घटनेचा तपास वरिष्ट पोलीस निरी.के.एन.पाटील, याचेसह स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस हवालदार शशिकांत काळे, अमित पवार, कुलदीप कोळी, संतोष पाडळे, मुकेश मोरे, दिग्विजय सांडगे, संग्राम पाटील यांनी केला. विवाह बाहय संबंधात कधी कोण कोणाचा घात करेल हे काही सांगता येत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

### प्रेमभंग होताच प्रियकर भयंकर...

आहे. ती शिक्षण घेत असताना तारूण्य सुलभ भावनेने तिच्याच वर्गात शिक्षण घेत असणाऱ्या निखील कांबळे याच्या प्रेमात पडली. निखील ही तिच्यावर मनापासून प्रेम करीत होता. ते दोघे ही कॉलेजच्या बाहेर भेटत होते. त्याचे प्रेम बहरत फुलत होते. त्या दोघांच्या प्रेमाची चर्चा कॉलेजच्या बाहेर चालू असायची. निखील हा तिला तिच्या स्वप्नातील राजकुमार वाटत होता.ती ही तशी दिसायला सुंदर आणि देखणी होती. तशी ही चर्चा अक्षताचे वडिल सदावि कोरे याच्या ही कानावर आली. त्यांनी तिच्यावर बंधने घालायला सुरूवात केली. ते तिला कॉलेजला सोडायला आणि आणायला ही जात होते.त्यामुळे अक्षतला आणि निखीलला भेटता येत नव्हते. तरी ही ते मोबाईलवरून एकमेकांशी संपर्क करून बाहेर भेटत होते. तर कधी कधी कॉलेजला दांडी मारून बाहेर फिरायला जात होते. निखीलला ती मनापासून आवडत असल्याने तो तिच्याबरोबर लग्न करू इच्छित होता. त्याने तसे तिला आपल्या मनातील बोलून ही दाखवले होते. परंतु तिला आपल्या घरातील लोकांची भीती वाटत होती.तिचे वडिल सदाशिव कोरे हे रागीट आणि तापट स्वभावाचे होते. मुलगी अक्षता ही खालच्या जातीतील मुलाच्या नादी लागल्याचे समजल्यावर त्यांनी तिच्यावर बंधने घालायला सुरूवात केली. कसे तरी चालू वर्षाचे तिचे शिक्षण पुर्ण करायचे आणि तिचे समाजातील मुलशी लग्न करून दयायचे असे त्यांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी स्थळाचा ही शोध घ्यायला सुरूवात केली होती. ही गोष्ट अक्षताला माहित झाल्यावर तिने प्रियकर निखील याला आपल्या घरचे आपल्यासाठी स्थळ शोधत आहेत. ते लवकरच माझे लग्न लावून देणार आहेत असे सांगितले. यावर निखील हा नाराज झाला. त्याला तिच्याबरोबर लग्न करायचे असल्याने त्यासाठी तो तिला जबरदस्ती करीत होता. ती मात्र आई-वडिलांच्या पुढे जायला तयार नव्हती. याच कारणातून त्या दोघात वाद होत होता. तुला जर माझ्याशी लग्न करायचे नाही तर मग तु मला तुझ्या प्रेमात कशाला अडकवले असे तो तिला म्हणत होता. आता ती आपल्याशी लग्न करायला तयार नसल्याने निखीलच्या मनात वेगळेच आले. तिचा उपभोग घेऊन तीला सोडायचे असा त्याने विचार केला. त्यासाठी तो तिला सेक्स करू या असे म्हणत होता.ती मात्र आपल्या मर्यादा सोडायला तयार नव्हती. तरी ही ती भेटायला आली की, तो तिच्याशी लगट करीत असायचा. ती त्याला जवळ करायला तयार नव्हती. याचा राग निखीलला येत होता.त्याच्या मनात वेगळेच असल्याने अलिकडे ती त्याला टाळू लागली. हे त्याला खटकले होते. त्यातच कॉलेजला सोडयला आणि आणायला तिचे वडिल येत असल्याने त्याची पंचायत झाली होती. आता त्याने यातून वेगळाच मार्ग काढयाचा ठरविले.कसे ही करून तिच्यासोबत मज्जा मारायची आणि तिला सोडून दयायचे असे त्याच्या मनात होते. सोमवार दि.११ मार्च रोजी नेहमी प्रमाणे सदाशिव कोरे हे मुलगी अक्षताला आपल्या दुचाकीवरून सकाळी ७.३० वाजणेच्या सुमारास सोडून गेले. हे त्यावेळी निखीलने बघितले. कॉलेच्या गेटमधून अक्षता आत येत असताना त्याने तिला गाठून चल आपण बाहेर जाऊन कॉफी घेऊया असे म्हटले. ती ही तयार झाली. ते दोघे ही कॉलेज मागील असणाऱ्या एका कॅफेत गेले.तेथे ते दोघे ही तासभर बसून गप्पा मारले. त्या दोघांनी सरळ सरळ कॉलेजला दांडी मारली असल्याने तेथून तो तिला फिरायला म्हणून गोड बोलत त्या पॅलेसच्या एका पडक्या खोलीकडे घेऊन गेला. तेथे कुणाची ये-जा नसल्याने दोघांनी ही बोलण्याची संधी होती. त्या पडक्या खोलीत घेऊन गेल्यावर निखीलच्या मनात वेगळचे आले. त्याची सेक्सची भावना उफाळून आली. तो तिला जवळ घेऊन तिचा किस घेऊ पाहत होता.ती मात्र त्याला हात ही लावू देत नव्हती. या कारणातून त्या दोघांत वादावादी सुरू झाली. तो तिला आपल्या मिठीत घेऊन खाली पाडत होता. त्याच्या मनात काय आहे हे तिने ओळखले असल्याने ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. तो मात्र एकाद्या कामांध पशु सारखे तिचे लचके तोडायच्या प्रयत्नात होता. तिने त्याला बाजुला ढकलून देण्याचा प्रयत्न केला असता त्या दोघांत झटापट सुरू झाली. ती ओरडण्याचा प्रयत्न करीत असताना त्याने तिच्या तोंडावर आपला हात दाबून धरला. तसे ती झटपटू लागली. त्याने तिची ओढणी तिच्या गळ्याभोवती आवळली.तसा तिचा श्वास गुदमरला गेला. ती टाचा घासत होती. त्याला मात्र तिची दया माया येत नव्हती. त्याने तिचा गळा इतक्या जोरात आवळला ती काही क्षणात शांत झाली. या झटापटीत त्याचे कॉलेजचे ओळखपत्र घटनास्थळी पडले. त्याचे त्याकडे लक्ष नव्हते.ती निचिप शांत झाल्यावर त्याने बाजुलाच पडलेला दगड उचलला मनातून तिला आर्वच्च भाषेत शिव्या देत मला अंगाला हात लावू देत नाहीस काय?असे म्हणत त्याने तो दगड तिच्या डोक्यात हाणला. तिच्या डोक्याला मोठी जखम झाली. तीचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याने ओळखून त्याने तेथून काढता पाय घेतला. इकडे कॉलेज सुटून बराच वेळ झाला तरी मुलगी अक्षता ही बाहेर आली नाही म्हणून तिचे वडिल सदाशिव कोरे हे तिची वाट पाहत बाहेर थांबले. ती बाहेर आली नाही म्हणून त्यांनी परत आपल्या घरी जावून ती आली की नाही हे बघितले.ती घराकडे आली नसल्याने त्यांनी दुपार पर्यत तिचा शोध घेतला. त्यांनी परत जावून कॉलेजमध्ये एका शिक्षकला अक्षता विषयी विचारले असता ती आज कॉलेजला आली नसल्याचे त्यांना समजले. यावरून ती कुठे तरी गेली असेल असे समजून दुपारी ४.०० वाजेपर्यंत तिची वाट बघितली. त्यांनी तिचा बऱ्याच ठिकाणी शोध घेतला. त्यानंतर त्यांनी ती बेपत्ता झाली असल्याची तक्रार जत पोलीसात दाखल केली. जत पोलीसांनी तक्रार दाखल करून घेऊन तिचा शोध घ्यायला सुरूवात केली असता एका इसमाने जत पोलीसांना सांगितले की, कॉलेजच्या मागील बाजूस असणाऱ्या पॅलेसच्या पडक्या खोलीत एका मुलीचा मृतदेह पडला आहे. या माहितीवरून पोलीसांनी घटनास्थळ गाठून पाहणी केली. घटनास्थळी झटापट झाल्याच्या खुणा दिसत होत्या. तर बाजुलाच निखील कांबळे नावाच्या विद्याथ्याचे ओळखपत्र पडले होते. घटनास्थळी पोलीसांनी ठसे तज्ञांना आणि श्वान पथकाला बोलावून घेऊन तपासाला सुरूवात केली. घटनास्थळी पोलीसांनी मयत मुलीची ओळख बेपत्ता अक्षता कोरे अशी पटवली. घटनास्थळी तक्रार दार सदाशिव कोरे यांना बोलावून घेतले. त्यांनी ही मयत मुलगी ही आपली मुलगी अक्षता कोरे असल्याचे पोलीसांना सांगितले. घटनास्थळी मयत अक्षताच्या आईने आणि नातेवाईकांनी केलेला अक्रोश हृदय पिटाळून टाकणारा होता. पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जत येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पडलेले निखील कांबळे याचे ओळखपत्र पोलिसांनी जप्त केले. रात्री ७.३०च्या दरम्यान घटनास्थळी पोलीस अधिक्षक रितु खोकर यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या.मयत अक्षता हिचे तिच्याच वर्गात शिकत असणाऱ्या निखील कांबळे याच्या बरोबर प्रेम प्रकरण असल्याचे पोलिसांना समजले होते. तसेच घटनास्थळी निखील याचे ओळखपत्र सापडले असल्याने संशयावरून पोलीसांनी जत शहरातील विाजी पेठेत राहत असणाऱ्या निखिल याचे घर गाठले. त्यावेळी घरात काही घडले नसल्याच्या अर्विभावात तो निवांत घरात झोपला होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे अक्षता कोरे हिच्या खूनाविषयी विचारले असता तो पोलीसांना मी काहीच केले नसल्याचे सांगत होता. पोलिसांनी त्याचा मोबाईल तपासला असता त्याने घटनेनंतर इस्टांग्रामवर एक पोस्ट केली असल्याचे दिसून आले.

हिंदी चित्रपटातील एक व्हिडिओ अपलोड करून त्यात रक्तपात कसा होतो असे लिहिले होते. त्याचा हा व्हिडीओ बघून पोलीस ही काही वेळ स्तबध झाले. त्यांनी ना चा पाढा वाचणाऱ्या निखील याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेची लेखी फिर्याद मयत अक्षता कोरे हिचे वडिल सदावि कोरे यांनी पोलीसांत दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी अक्षता सदाशिव कोरे(वय२०)याच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर निखील नामदेव कांबळे (वय २१) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला जत येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने निखील कांबळे याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस करीत आहेत.प्रेमा तुझा रंग कसा असे म्हटले जाते.ते निरपेक्ष आणि निस्वार्थी असले पाहिजे तरच त्या प्रेमात गोडवा राहतो.नाही तर त्या प्रेमात वासनांध पणा शिरला की अशा घटना घडतात हेच यावरून दिसून येते.

### लंपट म्हातारा वासनेने बेभान...

करण्यात आल्याची घटना पुढे आली. जागरूक नागरिक विशेषतः तरूणांमुळे ही घटना उघड झाली. चर्च परिसरात डिसेंबर २०२३ पासून फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यत सुरू असलेल्या या घटनेने समाजमन सुन्न झाले. नेवासा तालुक्यातील एका 'छोट्या गावात पीडीतेचे आजोबा रहातात. त्यांना एकंदर ४ मुली, एक मुलगा अशी अपत्ये. स्वतःची शेतीवाडी नसल्याने हे कुटुंब दुसऱ्याच्या शेतावर मोलमजुरी करून गुजराण करते. आजोबा, त्यांची पत्नी हे एका विवाहित मुलासह गावाकडेच रहातात. त्यांच्या सर्व मुला-मुलींची लग्ने झालेली आहेत. त्या विवाहित मुलींपैकी एक मुलगी अमरावतीला दिलेली होती. त्या मुलीचा नवरा दारूडा व जुगारी निघाला. त्या दाम्पत्याला दोन मुलीच आहेत. दारू अन् जुगाराच्या आहारी गेलेल्या या जावयाने एक मुलगी पैसे घेवून कोणाला तरी विकली होती. या घटनेची माहिती कळल्यानंतर आजोबांनी तिकडे जावून पैसे देवून मुलगी सोडवून आणली होती,तेंव्हापासून त्या आजोबांची ती मुलगी अन् दोघी नाती इकडेच रहातात. त्यापैकी एक मुलगी सज्ञान झाल्यानंतर त्यांनी लग्न लावून दिले होते. आता त्यांच्या मुलीची १० वर्षीय मुलगी सोनई येथील कन्या शाळेत पाचवीला शिक्षण घेत आहे. मुलाची मुलगीही कन्या शाळेतच आहे.

नेवासा तालुक्यातील सोनई गावाजवळील एक वस्तीजवळ झोपडपट्टीत आजोबांचा विवाहित मुलगा, त्याच्या ११ वर्षाच्या मुलीसह तसेच अमरावतीला दिलेली विवाहित मुलगी, तिच्या ११ वर्षाच्या मुलीबरोबरच दीड वर्षाच्या मुलाला घेवून रहात असते. आता बहीणीच्या १० व ११ वर्षाच्या मुली सोनई गावातील कन्या शाळेत शिक्षण घेत असतात. या मुलींची आजी इतर शेतकऱ्यांच्या शेतावर जात असे. त्यावेळी आजीची ओळख बेल्हेकरवाडी रस्त्यावरील चर्चमध्ये वॉचमन म्हणून काम करणाऱ्या उत्तम वैरागर याच्या बायकोशीझाली. मुलींच्या आजीची तब्येत अधून- मधून बिघडत असल्याने तिला खुरपणीला जातांना अडचणी येत असे. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने कामाचा खाडा परवडत नसे. वैरागरच्या बायकोने आजीला सांगितले, 'तू चर्चमध्ये ये. पास्टर प्रार्थना करतील अन् तुला बरं बाटेल.' त्याप्रमाणे डिसेंबर २०२३ या महिन्यात मुलींची आजी मुलींना घेऊन चर्चमध्ये आली. त्यावेळी उपस्थित पास्टरांनी प्रार्थना केली. त्याचवेळी आजीबरोबर आलेल्या दोघा नातींवर वॉचमन उत्तम वैरागरची बाईट नजर पडली. त्याने आजीला सांगितले, 'तुमच्या नातीच्या अंगात सैतान आहे. तुम्ही त्यांना इकडे पाठवत जा, आपण सैतान काढू.' तेव्हापासून आजी नातींना घेऊन चर्चमध्ये जाऊ लागली. पास्टर त्यांच्यासाठी प्रार्थना करत असत. इकडे फक्त नावाने उत्तम असलेल्या वैरागरच्या मनात काळबेरं येऊ लागले होते. मुली चर्च परिसरात आल्यानंतर तो त्यांच्याशी गोड बोलू लागला. त्यांना प्यायला पाणी दे, त्यांना चॉकलेट देवून त्यांच्याशी सलगी वाढवू लागला होता. तसे पाहिले चर्च असो वा गुरूद्वारा अथवा मंदिर अशा ठिकाणी आपण पवित्र मनाने यायला हवे. वावरायला हवे. कुठलेही वाईट विचार मनात यायला नकोत. बायबलमधील वचनांचाच विसर वैरागरला पडला होता. उपदेश क्र. ४:१ मधील वचन सांगते, 'तू देवाच्या मंदिरी जातोस तेंव्हा सांभाळून पाऊल टाक. बोध श्रवण करण्यास समीप जाणे हे मुर्खाच्या बलिहवनापेक्षा बरे. आपण अधर्म करतो हे त्यांना कळत नाही.' तसेच १ करिंथ ३ : १६ व १७ मध्ये 'तुम्ही देवाचे मंदिर आहात आणि तुमच्यामध्ये देवाचा आत्मा वास करतो. हे तुम्हाला ठाऊक नाही काय? जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करतो तर देव त्याचा नाश करील. कारण देवाचे मंदिर पवित्र आहे. तेच तुम्ही आहात.' अशी पवित्र वचने बायबलमध्ये दिलेली असतांना वयाने जख्खड झालेल्या उत्तम वैरागर या म्हाताऱ्याने अखेर शेण खाल्लेच. कोणताही धर्म वाईट सांगत नाही. धर्ममार्तंड सामान्यांचीदिशाभूल करतात. त्यांना फसवतात. त्यांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचा गैरफायदा घेतात. वॉचमन उत्तम वैरागरने चर्चमध्ये येणाऱ्या आजीच्या मुलींशी ओळख वाढवली. तो अधून-मधून गोड बोलून त्यांना चॉकलेट देत असे. चर्चमध्ये पास्टर नसतांना वैरागरने मुलींना चर्च परिसरात बोलावले. तेथील स्वच्छतागृहाच्या बोळात तो त्यांना घेऊन बसला. ८४ वर्षाचा म्हातारा त्यांच्याशी अश्लिल गप्पा मारू लागला. त्यांच्याशी चाळे करू लागला. अशा गोष्टी कधीही लपून रहात नाहीत. आजीच्या नातींनीही या गोष्टीची कल्पना त्यांच्या घरी दिली. घरच्यांचा संताप अनावर झाला. त्याचबरोबर चर्चच्या शेजारील ग्राऊंडवर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांच्या कानावर ही घटना गेली. डिसेंबर २०२३ ते दि. १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत केंव्हातरी या मुलांनी म्हाताऱ्यावर पाळत ठेवली. म्हातारा चर्च परिसरात मुलीला घेवून बसल्याचे त्यांना कळले. दाराची कडी उघडून म्हणा किंवा वॉल कंपाऊंडवरून येवून त्यांनी आत प्रवेश मिळवला. त्यावेळी मोबाईलचा कॅमेरा सुरू होता. वॉचमन उत्तम वैरागरला त्यांनी मुलींशी चाळे करतांना कॅमेऱ्यात कैद केले. घटनेची कुणकुण लागल्यानंतर पिडीतांच्या घरच्यांनी वैरागर तसेच इतरांना याविषयी जाब विचारला असता कोणतीही कार्यवाही झाली नाही. या प्रकरणाची परिसरातीलनागरिकांमध्ये दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. या घटनेमुळे नागरिकांमध्ये विशेषतः मुलींच्या पालकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले. तरूणांचा मोठा जमाव सोनई पोलीस ठाण्यात आला. घटनेची माहिती मिळताच डी. वाय.एस.पी. सुनिल पाटील, तसेच सोनई पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके हे तरूणांच्या जमावाला सामोरे गेले. दोघाही पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला, चर्च परिसराला भेट दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके, उपनिरीक्षक सुरज मेढे, प्रविण क्षिरसागर, मृत्यूंजय मोरे, बाळासाहेब बाचकर, सोमनाथ झांबरे, ज्ञानदेव आघाव, काकासाहेब बराख, मनिषा नरोटे, रूपाली धामणेया पोलीस पथकाने सुरूवातीला घटनेस कारणीभूत असलेला आरोपी उत्तम वैरागर याला ताब्यात घेतले. पिडीत मुलीच्या आईने दि. १६, फेब्रुवारी २०२४ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी चर्चमध्ये वॉचमन म्हणून काम करणारा उत्तम वैरागर (वय ८४) याच्यासह संजय वैरागर (वय ५०), सुनिल गंगावणे (वय ५०) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखलकरण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर मुख्य आरोपी व घटनेस कारण असलेला आरोपी उत्तम वैरागर या म्हाताऱ्या सैतानाला चर्च परिसरातून तर इतरांना वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक करण्यात आले. सर्व संशयितांना अटक करून नेवासा न्यायालयासमोर हजर केले. त्यांना दि. २० फेब्रुवारी २०२४ पर्यत ।पोलीस कोठडी ठोठावण्यात आली.

सर्व संशयित सध्या जेलमध्ये आहेत. तद्वतच या घटनेतील मुख्य संशयित कोणत्याही जाती-धर्माचा असलातरी अल्पवयीन मुलीशी अश्लिल चाळे करणारा तो सैतानच आहे. सर्व धर्मामध्ये असे सैतान असतात. धार्मिकतेचा बुरखा पांघरलेला आसाराम गेली अनेक वर्षापासून काळ्या कोठडीत आहे, गैरकृत्य करणारे हे नराधम पावित्र्याचे प्रतिक असलेले चर्च, मंदिर, मस्जिद असे काही न बघता त्यांची काळी कृत्ये करत असतात. अशा या दैत्यांना धडा शिकवण्यासाठी लोकांनी यांच्यावर करडी नजर ठेवली पाहिजे. या संतापजनक घटनेनंतर नागरिकांनी गटागटाने जावून पोलिसांना निवेदन देऊन आरोपींना कठोरात कठोर शासन करण्याचीमागणी केली. आर.पी.आय. या संघटनेनेदेखील या घटनेतील मुख्य आरोपी उत्तम वैरागर याला फाशी देण्यात यावी अशी मागणी करून निषेध व्यक्त केला. तसेच इतर संशयित आरोपींचा या घटनेशी संबंध नसल्यास त्यांना मुक्त करण्याची मागणी केली. अहमदनगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला, डी. बाय.एस.पी. सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके, उपनिरीक्षक सुरज मेढे, सहाय्यक फौजदार काकासाहेब राख, पोलीस हेडकॉन्स्टेबल लबडे, पोलीस नाईक बाळासाहेब बाचकर, कॉन्स्टेबल मृत्यूंजय मोरे, निखिल तमगर, प्रविण क्षिरसागर, सोमनाथ झांबरे, ज्ञानदेव आघाव, महिला कॉन्स्टेबलमनिषा नरोटे, रूपाली धामणे यांनी तपास केला. पिडीत मुलींची अहमदनगरयेथील सिव्हील हॉस्पिटलमध्येवैद्यकीय तपासणी करण्यातआली.

# पंधरा वर्षात देवणीकरांनी एकही खासदार बघितलाच नाही, ही सर्वात मोठी शोकांतिका

**देवणी/शकील मनियार**

लातूर लोकसभा मतदार संघात गेली पंधरा वर्षात एक टर्म काँग्रेसचे खासदार व दहा वर्षे भाजपचे खासदार राहिले आहेत एकाही खासदारांनी देवणीला तोंडही दाखविले नाही काही अपवाद संबंधित खासदारांचे फोटोही पाहिले नाहीत आजपर्यंत काँग्रेस व भाजप नेत्यांनी आर्थिक बाबी सदन असलेल्या पक्षातील नेत्यांना देवणीकरावर खासदार म्हणून लादले आहे त्यामुळे अक्षरशः पंधरा वर्षे देवणीकारांनी तो खासदार असलेला लोकप्रतिनिधी कधीही पहिला नाही त्यामुळे देवणीकरावर दिल्लीच्या लोकसभेत बसणाऱ्या खासदार महोदयांना देवणी कराना दिवा लावून शोधण्याची वेळ आली आहे चौदाव्या लोकसभेसाठी २००४ ते २००९ या कालावधीत भारतीय जनता पक्षाने रूपाताई पाटील निलंगेकर यांना उमेदवारी दिली मा शिवराज पाटील चाकूरकर यांना कंटाळून रूपाताईना मतदारांनी जनमताचा कौल देऊन निवडून आणले शिवराज पाटील चाकूरकर यांचा चाळीस ते पस्तीस वर्षाचा राजकीय प्रवास पुसून टाकला, परंतु देवणीकरासाठी रूपांताई पाटील यांचे देवणीसाठी काहीही



योगदान राहिले नाही स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी पंधराव्या लोकसभेसाठी २००९ ते २०१४ या कालावधीत लातूरचा काहीच गंध नसलेला कोल्हापूरचा पैलवान खा. जयवंत गंगाराम आवळे यांना लातूरची उमेदवारी देऊन आपल्या प्रतिष्ठेसाठी निवडून आणले एक वेळ निवडून गेला तर पाच वर्षे कधीही लातूरला आलाचं नाही, सोळावी लोकसभेसाठी डॉ.सुनील बळीराम गायकवाड यांना भारतीय जनता पक्षाने २०१४ व २०१९ या वर्षासाठी उमेदवारी देण्यात आली ते लातूरचे असले तरी देवणीकडे फिरकले नाहीत वयक्तिक नातेवाईक यांच्याकडे आले देवणीच्या विकासासाठी कोणतेही योग्यदान दिले नाही सतराव्या लोकसभेसाठी लातूर जिल्ह्यातील असले तरी कायम आपल्या व्यवसायासाठी मुंबई दिल्लीत असणाऱ्या सुधाकर शृंगारे २०१९ मध्ये उमेदवारी दिली ते सध्या लातूर जिल्ह्याचे विद्यमान खासदार आहेत आता अठराव्या लोकसभेसाठी सुधाकर शृंगारे दुसऱ्यांदा लोकसभेसाठी लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुक रिंगणात आहेत मागील पाच दहा वर्षात देवणी तालुक्याचे आपले नेमके योगदान काय आहे हे पहिले जाहीर करावे नंतर देवणी तालुक्यात मतदान मागण्यासाठी यावे. देवणी तालुक्यातील मूलभूत गरजा नेमक्या कोणत्या आहेत येथील देवर्जन ते देवणी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न रखडला आहे देवणीसाठी एम.आय. डी. सी. प्रश्न आहे देवणी जातीच्या वळूचा संशोधन केंद्र प्रकल्प भरदिवसा परळीला पळविला गेला कॅबिनेट बैठकीत असलेल्या मंत्र्यांनी देवणीसाठी भ्र शब्द ही काढला नाही देवणी जातीच्या वळूला एक पार्श्वभूमी असतांना त्या वळूचा नावात देवणी आहे ही देवणी जात प्रामुख्याने देवणी व परिसरात सापडते देवणी जातीच्या वळूने अखिल भारतीय पशु प्रदर्शनात कायम पहिला येऊन देवणी कारांचा मान सन्मान वाढविण्याचे काम केले आहे देवणी तालुक्याची अस्मिता पुसून टाकण्याचे काम भारतीय जनता पक्ष एकनाथ शिंदे व अजित पवार गटांनी केले आहे महाराष्ट्रातील तिनं त्रिपट असलेलं सरकार देवणीच्या मूळावर उठलं आहे त्यांच्यातील लोकप्रतिनिधी शंभर टक्के खोट बोलण्याचे काम करीत आहेत आता भारतीय जनता पक्ष विकासाचा मुद्दा बाजूला ठेवून देव देवदेवतांच्या भावनिक मुद्याला हात घालून राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न गेली दहा वर्ष देवणी तालुक्यात करीत आहे देवदेवतांचा भावनिक प्रश्न असला तरी बेरोजगाराच्या रोजी रोटीचा प्रश्न सुटला आहे का भारतीय जनता पक्षाने पाच वर्षापूर्वी दिलेल्या जाहीरनाम्यातील एकतरी मुद्याला हात घालून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे काय यांचे एकमेव उत्तर नाही असाच राहणार आहे हा खोटा जुमला करणाऱ्या भाजपाला देवणी तालुक्याच्या विकासाच काय हा प्रश्न विचारनार आहेत, काय राजकीय पक्षाला करोडो रुपये देऊन उमेदवारी मिळवनाऱ्याना निवडणून देणार काय हे देवणीकर आयत्या वेळी ठरविणार आहेत हे मात्र नक्कीच.!

# जिल्हा आरोग्य स्तरावरील या गावांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचा पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हा आरोग्य अधिकारी स्तरावरील निटूर, हंडरगुळी, हाडोळती, हलगरा, शिरुर ताजबंद, लामजना, वांजरवाडा, देवर्जन, हेर, गुडसुर, अतनुर, जवळा बु. नळेगांव, नळगीर, अंधोरी, पानचिंचाली, चिंचोली ब., जवळगा पोमादेवी, बोरी, निवळी, तांदुळजा, गंगापूर, चापोली, उजनी, खरोळा, कारेपूर, भातांगळी, चिकुर्डा मातोळा, भादा, बिटंरगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची कायाकल्प प्रोत्साहनपर पुरस्काराकरीता निवड राज्यस्तरावरुन करण्यात येऊन या संस्थाना प्रत्येकी रुपये ५० हजार रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्राची तपासणी नांदेड व धाराशिव जिल्ह्यातील मूल्यांकनकर्तामार्फत करण्यात आली होती. जिल्हा आरोग्य अधिकारी स्तरावरुन किनी यल्लादेवी आरोग्य वर्धिनी केंद्राला एक लाख रुपयांच्या जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार, तर काजळ हिप्परगा, आरोग्य वर्धिनी केंद्र या संस्थेस जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्कार ५० हजार रुपये तसेच घोणशी आरोग्य वर्धिनी केंद्र या संस्थेस जिल्हास्तरीय तृतीय पुरस्कार रुपये २५ हजार जाहीर झाला आहे. तसेच लातूर जिल्हयातील १०८ आरोग्य वर्धिनी केंद्रास प्रोत्साहनपर रुपये २५ हजार पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक स्तरावरील लातूर स्त्री रुग्णालय, उदगीर सामान्य रुग्णालय, निलंगा उपजिल्हा रुग्णालय, मुरुड ग्रामीण रुग्णालय, अहमदपूर ग्रामीण रुग्णालय, किल्लारी ग्रामीण रुग्णालय, चाकूर ग्रामीण रुग्णालय, रेणापूर ग्रामीण रुग्णालय, बाभळंगाव ग्रामीण रुग्णालय, देवणी ग्रामीण रुग्णालय या आरोग्य संस्थाची कायाकल्प प्रोत्साहनपर पुरस्काराकरीता राज्यस्तरावरुन निवड झालेली आहे. या संस्थाना प्रत्येकी एक लाख रुपये जाहीर झाला आहे. कायाकल्प पुरस्कार सन २०२२-२०२३ अंतर्गत राज्यात सर्वाधिक पुरस्कार निधी रुपये ५८ लाख ३५ हजार रुपये लातूर जिल्ह्याला जाहीर झालेला आहे. जिल्ह्यातील ३२ प्राथमिक आरोग्य केंद्राना रुपये १७ लाख ३५ हजार रुपये पुरस्कार निधी, १११ आरोग्य वर्धिनी केंद्राना २८ लाख ८५ हजार रुपये पुरस्कार निधी व जिल्हा शल्य चिकित्सक अंतर्गत रुग्णालयांना १२ लाख रुपये पुरस्कार निधी जाहीर झालेला आहे. कायाकल्प पुरस्काराकरीता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही.वडगावे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा माताबालसंगोपन अधिकारी डॉ. बोडके एन.डी., सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पंडगे ए.सी., अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बरुर बी.एस., ता.आ.अ. उदगीर डॉ. कापसे पी.एस., जिल्हा गुणवत्ता नियमन समन्वयक डॉ. रेड्डी पी.ए. यांनी कायाकल्प अभियानाच्या अनुषंगाने जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

## साप्ताहिक 'क्राईम संध्या'च्या मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन फॉर्म नं.४ (नियम ८ अन्वये)


१) **प्रकाशन स्थळ** : साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर.

२) **प्रकाशन काळ** : साप्ताहिक

३) **मुद्रकाचे नाव** : श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे

भारताचे नागरीक आहेत काय? : होय.

पत्ता : साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर.

४) **प्रकाशनकाचे नाव** : श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे

भारताचे नागरीक आहेत काय? : होय.

पत्ता : साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर.

५) **संपादकाचे नाव** : श्री. धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे

भारताचे नागरीक आहेत काय? : होय.

पत्ता : साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर.

मी, धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**दिनांक : १८ मार्च २०२४**

**धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे**
**प्रकाशक**


# सव्वानऊ लाखांचा गुटखा जप्त

सोलापूर : सोलापूर शहर गुन्हे शाखा व अन्न औषध प्रशासनाने एका व्यक्तीस ताब्यात घेऊन त्याच्याकडून सुमारे सव्वानऊ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. सोलापूर शहर गुन्हे शाखेचे पथक व अन्न औषध सुरक्षा अधिकारी हे शहरात अवैध गुटखा विक्री संदर्भात गस्त घालत असताना त्यांना महांतेश गुब्याडकर हा त्याच्या घरातून अवैध गुटखा विक्रीचा व्यवसाय करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकातील अधिकारी पोलीस अंमलदार व अन्न औषध प्रशासनाने संयुक्तपणे महांतेश सिद्धाराम गुब्याडकर (३७) याच्या राहत्या घरी छापा टाकला असता तेथे तसेच त्याच्या घराशेजारी एका गोडाऊनमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला अन्नपदार्थाचा साठा सापडला. त्यासाठी बाबतकरांकडे अधिक चौकशी केली असता तो त्या ठिकाणी मिळून आलेला प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या अवैधरित्या व्यापार करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे अन्नसुरक्षा अधिकारी रेणुका पाटील यांनी गुब्याडकर यांचे घरातून तसेच गोडाऊन मधून आरएमडी गुटखा, रजनीगंधा पानमसाला, नवरतन पान मसाला, बाबा १२० तंबाखू, सुगंधित सुपारी एम सुगंधित तंबाखू असा एकूण ९ लाख २८ हजार ७४६ रुपयांचा गुटखा जप्त करून आरोपी विरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास गुन्हे शाखेकडील पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख हे करीत आहेत. सदर आरोपी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यास दोन दिवस पोलीस कोठडी दिली आहे.

# सामाजिक संस्थेकडून भागते बसस्थानकात प्रवाशांची तहान

**अहमदपूर/प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानकात स्व.श्रीमती जानकबाई श्रीरामजी व्यास यांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीराम जानकी भवन व रोकडेश्र्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूर बस स्थानकात गेल्या १७ वर्षापासून प्रवासासाठी पानपोई लावली जाते. जीवन जगत असताना आपण समाजाचं काही देणं लागतो या उद्देशाने तीन रांजण ठेवून सुरू केलेल्या पाणपोईमुळे प्रवाशांना भर उन्हाळ्यात मोठा आधार मिळत असून ये-जा करणाऱ्या प्रवाशांची तहान या पानपोईमुळे भागत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच जनसेवेच्या भावनेतून पाणपोई उभारण्यासाठी सामाजिक संस्था दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहेत. कधीकाळी प्रत्येक चौकात दिसणारी पाणपोई आता शहरातील कोणत्यातरी भागात दिसून येत आहे यापूर्वी अहमदपूर बस स्थानकात प्रवाशांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती प्रवाशांची होणारी गैरसोय पाहून शहरातील या संस्थेच्या वतीने पाणपोई सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. सामाजिक संस्थेने तीन रांजणाच्या माध्यमातून पाणपोई सुरू केली. दररोज स्वच्छ पाण्याने रांजणे भरून ठेवली जातात भर उन्हाळ्यात या पानपोईचा आधार प्रवाशांना मिळत आहे तसेच या संस्थेकडून शहरात सतत धार्मिक सामाजिक उपक्रम राबवले जातात या पाणपोईचे उद्घाटन अहमदपूर नगर परिषदेचे आयएएस मुख्याधिकारी नमन गोयल यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख पृथ्वीराज कोकाटे साहेब हे होते. आपल्या उद्घाटकपर भाषणात मुख्याधिकारी साहेब यांनी संस्थेच्या कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या आणि त्यांना नागरिकांनी आठवड्यातून एकदा नळाला पाणी येतो असा प्रश्न विचारला असता आता मी आलो आहे योग्य उपाययोजना करून दोन दिवस आड शहराला पाणीपुरवठा करेन असे आश्वासन दिले. याप्रसंगी श्रीराम जानकीभवनचे अध्यक्ष राधेश्यम पुरोहित सचिव जुगलकिशोरज शर्मा नितीन धर्माधिकारी, प्रा.मारुती बुद्रुक पाटील, दिनकर मदेवाड माहेश्वरी महासभाचे अध्यक्ष सचिन बजाज, सचिव आनंद बाहेती युवा माहेश्वरीचे अध्यक्ष रविराज भुतडा, सचिव गिरीश बाहेती, गोपाल शर्मा, विनोद भुतडा, महेश पाटील, गणेश शर्मा, श्रीकांत शर्मा, सोमनाथ पुणे, दिनेश सोनी, गणेश शर्मा भागवत सोलीवाल, बालू मेनकुदळे, माणिक गुळवे सचिन बजाज आदींची उपस्थिती होती.

# शिवसेना व शिवप्रेरणा फाऊंडेशनतर्फे वसईत भव्य चित्रकला स्पर्धा




**वसई/प्रतिनिधी**

शिवसेना व शिवप्रेरणा फाऊंडेशनतर्फे वसईतील आर.पी.वाघ हायस्कूल येथे भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर चित्रकला स्पर्धेत तब्बल ६०० विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना दिलेल्या विषयातून तसेच दिलेल्या ०४ गटातून प्रत्येकी गटातून २ उत्तेजनार्थ व तीन क्रमांक पारितोषिके काढण्यात आले.सदर चित्रकला स्पर्धा ही शिवसेना वसई उपशहर प्रमुख (अध्यक्ष) प्रशांत कदम व शिवसेना वसई तालुका समन्वयक (कार्याध्यक्ष-सचिव) योगेश पाटील यांनी आयोजित केलेली असून सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन हे शिवप्रेरणा फाऊंडेशनचे कार्यकारी प्रमुख हतिक शिंदे यांनी केले. सदर चित्रकला स्पर्धाकरीता मुख्य परीक्षक वसईतील सुप्रसिद्ध चित्रकार सुभाष गोंधळे सर,सौ.पूजा मालवणकर व न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक कौशिक जाधव, अभिमान पाटील सर तसेच कु.मेघा साळुंखे हे असून त्यांनी त्यांच्या सर्व टीम सहित सदर चित्रकलेचे परीक्षण केले. ज्यात विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर असे चित्र काढलेले. सदर कार्यक्रमात शिवसेना वसई विधानसभा संपर्क प्रमुख जगदीश कदम, शिवसेना उपजिल्हा प्रमुख जनार्दन म्हात्रे, शिवसेना जिल्हा सचिव मिलिंद खानोलकर, शिवसेना जिल्हा कार्यकारिणी सदस्य दिलीप सुर्वे, शिवसेना वसई शहर प्रमुख प्रथमेश राऊत, शिवसेना वसई शहर समन्वयक निलेश भानुशे, शिवसेना महिला आघाडी शहर संगिता भोईर हे प्रमुख मान्यवर उपस्थित असून सादर कार्यक्रमाचे सर्व विद्यार्थ्यांची देखरेख ही शिवप्रेरणा फाऊंडेशन सदस्य कमलेश कांदू, राज राऊत, अजय म्हात्रे, अनिल गुप्ता, मधुकर जाधव तसेच न्यू इंग्लिश स्कूल माजी विद्यार्थी स्वयंसेवक वैष्णवी म्हात्रे, दिपक वानखेडे, प्रतिक्षा चौधरी, इशिता तावडे, ऋतिक राठोड यांनी केली असून आयोजित केलेली भव्य चित्रकला स्पर्धा ही अतिशय सुंदर पार पडली विद्यार्थी व पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# वसई-विरार महापालिकेतील एकमेव परिवहन समिती संपुष्टात

विरार : वसई-विरार महापालिकेत एकमेव परिवहन समिती सदस्य सहा जणांची असलेली कार्यरत होती. ती ३१ जानेवारी रोजी संपुष्टात येत असून आता पालिकेचा एकूणच कारभार निव्वळ प्रशासकांच्या हाती असणार आहे. गेले तीन वर्ष पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका न झाल्याने आधीच नागरीकांची ओरड आहे. लोकप्रतिनिधींना व राजकीय पक्षांना पालिकेत लोकनियुक्त कारभाराची संधी मिळत असते. आधी महाविकास आघाडी आणि सध्याचे शिंदे-फडणवीस व मोदी अमित शहांचे सरकार यांनी महाराष्ट्रातील वीस महापालिकांच्या निवडणुका ठप्प करुन ठेवल्या आहेत. पालिकेची निवडणूक गेले तीन वर्षे रखडली आहे. साहजिकच पालिकेत प्रशासकीय कारभार आहे. अपवाद फक्त परिवहन सेवेचा होता. बारा सदस्यांची परिवहन समिती निवडण्यात आली होती. आधी भरत गुप्ता त्याच्यानंतर प्रितेश पाटील हे या समितीचे सभापती होते. अवघ्या चाळीस दिवसाकरिता कल्पक पाटील हे समितीवर निवडून आले. त्यांनी पालिकेच्या लोकाभिमुख कारभारासाठी या काळात काही कल्पना राबविल्या आहेत. या समितीवर १८ डिसेंबरला परिवहन समिती सभापती म्हणून निवडून आलेल्या कल्पक पाटील यांची कारकिर्द ही अवघ्या ४० दिवसांची ठरली आहे. हा पालिकेच्या इतिहासातील सभापतीपदाचा सर्वात कमी कालावधी ठरला आहे.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)**
**दुरध्वनी - ७२१९३७०००६/७२१९३७०००९**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे-०२ | १५/७ | ६२०९ | मंजू कन्हैयालाल परमार व कन्हैयालाल भवूतमलजी परमार | छाया सुरेश अस्वाल व सुनिता सुरेश अस्वाल |
| २. | आचोळे-०२ | ३०६/१४९ | ६२११ | शिवशक्ती डेव्हलपर्स | हेत अशोक कुमार दुंगानी |
| ३. | आचोळे-०९ | ६११/२५ | ६२१३ | गिरधारी सिंग | सर्वेशकुमार रामदुलार चौरसिया |
| ४. | आचोळे-०६ | ११३/१९४ | ६२१४ | शोभा दिलीप गायकवाड | अंकित अनिल जाधव |
| ५. | आचोळे-०५ | १५४/४३ | ६२१६ | संतोष तुकाराम नाचणकर | किरण सोनू लाड |
| ६. | आचोळे-०५ | १३६/३० | ६२२० | सविता सदाशिव निर्मळ | शितल सत्यवान जाधव व सत्यवान भास्कर जाधव |
| ७. | आचोळे-०९ | ७४३/४७ | ६२२३ | राधेश्याम तेरशुराम प्रजापती | सलोनी रमाकांत पदरत |
| ८. | आचोळे-०४ | २३७/९ | ६२२४ | बेलादेवी गुप्ता | अरविंद कुमार सिंह व सुशिला अरविंद कुमार सिंह |
| ९. | आचोळे-०५ | २०/१३ | ६२२६ | इब्राहिम जमाल छिपा व शमीम/जमशीर/कलीम सलीम छिपा | सलीम इब्राहिम छीपा |
| १०. | आचोळे-९/१ | ५८३/१५ | ६२२८ | रश्मी हाऊसिंग प्रा.लि. | जियालाल श्यामबरन यादव व राधा जियालाल यादव |
| ११. | आचोळे-०६ | ११३/१५ | ६२३० | रामनाथ कानु महाडीक | एकनाथ कानू महाडीक |
| १२. | आचोळे-०८ | १७६/२९ | ६२३४ | संदीप शंकर शिर्के | हरिश्चंद्र रामपलट निशाद |
| १३. | आचोळे-०७ | ७६/३६ | ६२३६ | थॉमस बी. फिगेर | संदेश अनंत कळंबाटे |
| १४. | आचोळे-०४ | २४४/३४ | ६२४२ | सुरया निजाम शेख | संगीता दिनेश दुबे |
| १५. | आचोळे-०५ | ६३/२९ | ६२४४ | शक्तीकुमार | अंजनी सुहास चव्हाण |
| १६. | आचोळे-९/१ | ७१४/१७ | ६२४६ | अमेया होम्स ॲण्ड इन्फ्रा प्रा.लि. | अभिषेक सिंह व प्रियंका अभिषेक सिंह |
| १७. | आचोळे-९/२ | ७४८/३९ | ६२४८ | श्री जी कंट्रक्शन | एसिअन रेजिनल्ड फर्नांडिस |
| १८. | आचोळे-९/२ | ७४८/३७ | ६२५० | श्री जी कंट्रक्शन | केईथ अथनसिओ परेरा |
| १९. | आचोळे-९/१ | ४७७/२२ | ६२५२ | मेहता डेव्हलपर्स | गीता कुलदीप कन्याल |
| २०. | आचोळे-०५ | ६५/८ | ६२५४ | प्रशांत परशुराम परब | नानासो तुकाराम पाटील व पांडुरंग शंकर खोत |

**जावक क्र. वविशम/कवि/४५७३/२०२३-२४**
**दिनांक : १२/०३/२०२४**

सही/-
**प्र.सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

# पॉलिटिकल देंग्यांची पोलखोल!

देश असो, की कुटुंब असो, की एखादी संस्था असो, या सर्वांचा खर्च चालवण्यासाठी पैसा लागतो. राजकीय पक्षांच्या बाबतीत सुद्धा तेच आहे, पक्ष चालवण्यासाठी पैसा लागतो आणि राजकीय पक्षांची व्याप्ती मोठी असल्यामुळे, त्यांना आपला पक्ष वाढवण्यासाठी, पक्षाचे विविध कार्यक्रम आयोजित करावे लागतात. त्यासाठी पैसा लागतो. पण राजकीय पक्षांकडे हा पैसा कुठून येतो? याबाबत अजून पर्यंत तरी जनतेतून विचारणा झाली नव्हती. राजकीय पक्ष त्यांचे मोठमोठे इव्हेंट, त्या पक्षांच्या नेत्यांचे दौरे ,तसेच आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम, यासाठी लागणारा पैसा त्या पक्षाचे पुढारी आपल्या खिशातून खर्च करत नाहीत .तर हा सगळा पैसा अर्थातच देणग्यांच्या मार्फत येत असतो .यापूर्वी राजकीय पक्षांच्या देणग्यांबाबत कधीही कुठेही सार्वजनिक रित्या चर्चा झाली नव्हती. परंतु कर्जरोख्यांच्या मुद्द्यावरून, राजकीय पक्षांना मिळणाऱ्या पक्ष निधीची चर्चा थेट न्यायालयापर्यंत पोचली. आणि राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधी बाबतची माहिती लोकांना मिळावी, यासाठी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावनी, नंतर सर्वोच्च न्यायालयाने राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीचा तपशील सादर करावा. असे आदेश एसबीआय ला दिले होते. कारण एसबीआयच्या मार्फतच कर्जरोख्यांमधून राजकीय पक्षांना देणग्या दिल्या जात होत्या. त्यामुळे या देणग्यांबाबतची सगळी माहिती एसबीआयकडे उपलब्ध आहे. परंतु आजवर कधीही एसबीआयने स्वतःहून ही माहिती सार्वजनिक केली नव्हती. पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, एसबीआय ला याबाबतचा तपशील सादर करावा लागला. सुरुवातीला या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने एसबीआयने सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ मागितला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाने वेळ देण्यास नकार दिल्यामुळे, ११ मार्च रोजी याबाबतचा अहवाल एसबीआय ला निवडणूक आयोगाकडे सादर करावा लागला. परंतु हा अहवाल पारदर्शक नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाल संशय असल्याने, सर्वोच्च न्यायालयाने तशी टिप्पणी ही केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या एसबीआय च्या अहवालात, खरे तर कुठल्या पक्षाला किती, देणगी देण्यात? कधी देण्यात आली.याची तपशीलवार माहिती असायला हवी होती. परंतु ही माहिती पारदर्शक नसल्यामुळे, राजकीय पक्षांना मिळालेल्या निधी बाबत आता संशय निर्माण झाला आहे. तसे पाहता कुणीही कुणाचे फुकट काम करीत नाही. याचाच अर्थ सत्ताधारी पक्षाला किंवा विरोधी पक्षाला ज्याने कोणी देणग्या दिल्या आहेत, त्यांची त्या राजकीय पक्षांनी कामे केलेली आहेत. अर्थात ती सगळीच काही कामे कायदेशीर किंवा नियमात बसणारी होती अशातला भाग नाही. तर काही गोष्टी नियमबाह्य झालेल्या असणार. सर्वाधिक देणग्या अर्थातच सत्ताधारी भाजपाला मिळालेल्या आहेत .भाजपाला सहा हजार सहाशे कोटींच्या देणग्या मिळालेल्या आहेत. तर काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांना भाजपच्या तुलनेत खूपच कमी देणग्या मिळालेल्या आहेत. त्यामुळे ज्या व्यावसायिकांकडून भाजपाला सर्वाधिक देणग्या मिळाल्या आहेत, त्यांची अशी कोणती नियमबाह्य कामे सत्ताधारी पक्षाने केली हे जाणून घेण्याचा जनतेला पूर्ण अधिकार आहे. सध्या केंद्रातील मोदी सरकार अदानी आणि अंबानी यासारख्या बड्या उद्योजकांच्या पाठीशी आहे. अदानी बाबत सरकारला खूपच सॉफ्ट कॉर्नर आहे. आजवर बरेचसे प्रकल्प अदानी ग्रुप ला का मिळाले त्याचे उत्तर आता लोकांना मिळाले आहे. कारण लोकसभेच्या अधिवेशनात अदानी बाबत विरोधकांनी अनेक प्रश्न उपस्थित करूनही, सरकारकडून खास करून पंतप्रधान मोदींकडून कोणतेही उत्तर विरोधकांना मिळालेले नाही. याचा अर्थ काय? सरकारची पक्षातल्या लोकांची व्यापारी उद्योजकांपर्यंत सलगी असते हे खरे आहे. परंतु काहीतरी मोबदल्या बदल्यात उद्योजकांची नियमबाह्य कामे करायची, हा एक प्रकारे जनतेचा विश्वासघात आहे. केंद्र सरकारने भ्रष्टाचार विरोधी मोहिमेअंतर्गत, आजवर विरोधी पक्षातल्या अनेक राजकीय पुढाऱ्यांवर, तसेच काही कंपन्यांवर इन्कम टॅक्स तसेच ईडीच्या धाडी टाकल्या. परंतु सरकारच्या मर्जीतल्या ज्या काही कंपन्या आहेत, जे काही उद्योगपती आहेत त्यांच्यावर मात्र अजून पर्यंत ईडी किंवा अन्य तपास यंत्रणांच्या धाडी पडलेल्या नाहीत. हा सर्व प्रकार संशयास्पद आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाला एसबीआय च्या अहवालाबाबत संशय असेल, सर्वात प्रथम एस बी आयच्याचौकशीची आवश्यकता आहे. कारण एसबीआय कडून व्यवसायिकांचे कर्जरोखे स्वीकारताना संबंधितांची चौकशी केलेली असणार. त्यांनी कर्जरोख्यांच्या मार्फत विविध राजकीय पक्षांना देणग्या म्हणून दिलेला पैसा, हा त्यांच्या व्यावसायिक नफ्यातला होता की, अन्य चुकीच्या मार्गातून आलेला होता? याची चौकशी व्हायला हवी. जर याची चौकशी झाली तर कोट्या वधिंच्या काळया पैशाचा तपास लागू शकेल. कारण राजकीय पक्षांना दिल्या जाणाऱ्या देणग्यांमधील बहुतेक पैसा हा काळा पैसा असू शकतो. त्यामुळे हा काळा पैसा कुठल्या कंपन्यांकडून किंवा कुठल्या व्यावसायिकांकडून एसबीआय मध्ये आला आणि तो राजकीय पक्षांना देण्यात आला. याची माहिती जनतेला मिळायला हवी. परंतु लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकार अशी माहिती उघडकीस येऊ देणार नाही आणि हाच खरा भ्रष्टाचार आहे. परंतु भ्रष्टाचार विरोधी मोहीम चालवणारे मोदी या असल्या भ्रष्टाचाराबाबत काहीही बोलणार नाहीत. कारण हा त्यांच्या पक्षासाठी उत्पन्नाचा एक महत्त्वपूर्ण सोर्स आहे .पण व्यावसायिकांकडून अशा पद्धतीने काळा पैसा देणग्या म्हणून घेणे आणि त्यावर पक्षाचा कारभार चालवणे, सरकार मार्फत काही बड्या उद्योगपतींना सवलती देणे, हे रॅकेट कुठेतरी थांबायला हवे. एसबीआयने दोन भागांमध्ये माहिती दिलेली आहे. यात एका भागामध्ये देणगीदरांची नावे आणि त्यांनी दिलेल्या रकमा. तर दुसऱ्या भागात राजकीय पक्षांना दिलेल्या देणग्या ची माहिती. मात्र यांना जोडणारा दुवा दिलेला नाही. त्यामुळेच न्यायालयाने एसबीआयच्या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे. हा अहवाल खरंतर पारदर्शक असणे गरजेचे होते. परंतु जर समजा हा अहवाल एसबीआयने खऱ्या माहितीचा आधारे प्रसिद्ध केला असता, तर देणघा देणाऱ्या उद्योगपतींची आणि कंपन्यांची पोलखोल झाली असती. कदाचित सरकारला त्यांच्या चौकशा कराव्या लागल्या असत्या. म्हणूनच एसबीआयने या अहवालात सुद्धालपवा छपवी केली आहे. म्हणूनच चौकशीची गरज आहे.

# पाटण तालुक्यातील दरडग्रस्त कुटुंबांच्या कायमस्वरूपी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन




**सातारा/प्रतिनिधी**

पाटण तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधित आठ गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून १६० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून बाधितांना उत्कृष्ट दर्जाची घरे देण्यात यावीत, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. मोरगिरी, ता.पाटण येथे दरडग्रस्त कुटुंबांचे कायमस्वरुपी पुनर्वसन प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील प्रत्येक घटक सुखी-समाधानी रहावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे सरकार असून सर्व आपत्तीच्या प्रसंगी पाठीशी राहणारे सरकार आहे. संकटकाळात नेहमीच शासनाने मदतीचा हात दिला आहे. त्यामुळे दरडग्रस्त कुटुंबांना सर्व सुविधायुक्त घरे देण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही याची ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. ते म्हणाले, गेल्या दीड वर्षात शासनाने सर्व सामान्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. राज्यात अनेक विकासाचे प्रकल्प सध्या सुरु असून शासनाने महिला सक्षमीकरणासाठी महिला धोरण जाहीर केले असून लेक लाडकी योजना, एसटीमध्ये ५० टक्के सवलत, महिला बचत गटांच्या खेळत्या भांडवलात वाढ दिल्याचे सांगून त्यांच्या उत्पादनांना विक्रीसाठी संधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री म्हणाले की, सातारा जिल्ह्यात सुरु करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार उपक्रमामुळे कोयना धरणाच्या पाणीसाठ्यात १० टीएमसीने वाढ होईल. सातारा जिल्ह्यात अनेक सोयी-सुविधा, प्रकल्प सुरु असून २२५ मॉडेल स्कुल, ८४ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे. मुनावळे प्रमाणेच पाटणमध्ये करण्यात येणाऱ्या जलपर्यटन प्रकल्पासाठी ७० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे सांगून शिक्षण, आरोग्य आणि पर्यटनाला चालना दिल्यामुळे जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. पर्यटनाला चालना देण्यासाठी ४२६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. पर्यावरणाचा समतोल राखून सर्व प्रकल्प पूर्ण करावेत असेही मुख्यमंत्री म्हणाले. शासन आपल्या दारी उपक्रमाच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील लाखो नागरिकांना लाभ मिळाला असून राज्यातील चार कोटी लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. राज्यात ७०० 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरु करण्यात आले आहेत. महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील लाभाची मर्यादा १.५० लाखाहून वाढवून ५ लाख रुपये करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, अतिवृष्टीमुळे आंबेघर (खालचे, वरचे), ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी आणि काहीर या आठ भूस्खलनबाधित गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या पुनर्वसनासाठी आवश्यक भूसंपादन करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून निधी मंजूर करण्यात आला आहे. आठ गावांतील ४९९ कुटुंबांचे यामुळे कायमस्वरूपी पुनर्वसन होणार असून पुनर्वसित ठिकाणी अंतर्गत रस्ते, पिण्यासाठी स्वच्छ पाणीपुरवठा, ग्रामपंचायत कार्यालय, सार्वजनिक शौचालय, वैयक्तिक एकल विद्युत जोडणी, अंगणवाडी, खेळाचे मैदान, समाजमंदिर इत्यादी नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असेही देसाई यांनी सांगितले.

**महसूल अधिकाऱ्यांना वाहनांचे लोकार्पण**

सातारा जिल्ह्यात राज्यात प्रथमच महसूल विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पणही करण्यात आले. या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांना देखील ईनोवा गाड्या देण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

**मल्हारपेठ पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत व निवासस्थानांचे निवासस्थानांचे ई-लोकार्पण**

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मल्हारपेठ पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत व निवासस्थानांचे तसेच पाटण पोलीस स्टेशन येथील अधिकारी-कर्मचारी यांच्या निवासस्थानांचे ई-लोकार्पण करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, रविराज देसाई, जयराज देसाई, उपविभागीय अधिकारी सुनील गाडे, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार शिरगाव किल्ला जतन संवर्धन व दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यता

**पालघर/प्रतिनिधी**

शिरगाव किल्ला राज्य संरक्षित स्मारक,जतन,संवर्धन व दुरुस्ती अंतर्गत ६ कोटी २४ लाख २३ हजार २९१ रुपयांच्या निधीला सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. वरील प्रशासकीय मान्यता मध्ये खालील अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत. आदेशातील कामांचे व अनुषंगिक अभिलेखे यांचे निरिक्षण व तपासणिचे काम, संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्या कडून आणि जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून अथवा नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन अथवा संबंधीत खात्याने नेमून दिलेल्या अधिकाऱ्याकडून होऊ शकेल. आदेशातील कामांना जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत असून जिल्हा वार्षिक योजनेतून करण्यात येणारे काम विहीत कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. आदेशातील कामे सदर योजणेतंर्गत अनुज्ञेय असल्याबाबत खात्री करण्यात यावी. योजनेतंर्गत अनुज्ञेय नसलेल्या कामांवर निधी खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. उपरोक्त योजनेअंतर्गत मंजुर कामांचे ठिकाणी काम सुरू करण्यापूर्वी नामफलक लावावे. यामध्ये योजनेचे नाव, काम सुरु झाल्याची दिनांक, काम पूर्ण होण्याचा कालावधी, कामांची मंजूर किंमत, कार्यान्वयीन यंत्रणा, कंत्राटदाराचे नाव, दोष निवारण कालावधी दर्शविण्यात यावा. काम चालू असताना अंमलबजावणी अधिकारी यांनी कामावर भेटी देऊन काम अंदाजपत्रकानुसार आणि ठरलेल्या कालावधीत चालू आहे याची वेळोवेळी खात्री करावी.



काम पूर्ण झाल्यानंतर कामांची नोंद संबंधीत शासन, स्थानिक स्वराज्य संस्थेने शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात मालमत्ता नोंदवहीत स्वंतत्र घेण्यात यावी. काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा पुर्णत्वाचा दाखला व कामावर केलेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र या कार्यालयास आठ दिवसाच्या आत सादर करावेत. काम पूर्ण झाल्यानंतर ते त्वरीत जनतेच्या सार्वजनिक वापरात येतील याची दक्षता संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांनी घ्यावी. कामनिहाय खर्चाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या जात या कार्यालयास सादर करावा, कामाची गुणवत्ता राखणे व मंजुर अंदाजपत्रकानुसार, आराखड्यानुसार काम करुन घेण्याची जबाबदारी ही कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. कामे सुरू होण्या पुर्वीचे, काम प्रगतीत असतांना आणि काम पुर्ण झाल्यानंतरचे कामांचे छायाचित्र अंतिम देयकाची मागणी करतांना या कार्यालयास सादर करावे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी या कामाच्या प्रत्येक बांधकामास सुरूवात करण्यापुर्वी काम कोणत्याही पाटबंधारे, जलविद्युत, पाणीपुरवठा प्रकल्पांच्या जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या वरील कामावर कोणताही परीणाम होणार नाही याची खात्री करून घेतली पाहीजे. खर्चाचे विवरण पत्र दरमहा पुढील महियाच्या ५ तारखेपर्यंत, कामनिहाय विहित प्रपत्रात या कार्यालयास पाठवावे. निधीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून निधी उपलब्ध झाल्यावरच कामे कार्यान्वीत करावीत. सदरच्या कामांवर प्राप्त निधी त्या त्या संबंधीत कामांवरच कामनिहाय खर्च करावा, अन्य कामांवर खर्च करु नये. प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा कामावर झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक-बचत रक्कम काम पुर्ण झाल्यावर ३० दिवसाच्या आत या कार्यालयास परत करावी. प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक-बचत रक्कम ३० दिवसाच्या आत या कार्यालयास परत करावी. प्रशासकीय मंजूरी दिलेली कामे ही खाजगी मालकीच्या जागेवर असणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रस्तावित कामासाठी लागणाऱ्या कामाच्या जागा मालकिचा दाखला सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये. प्रस्तावित कामाच्या जागेत कोणताही बदल करु नये. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे नाऱ्हरकत प्रमाणपत्र दिले असे समजण्यात येऊ नये. भविष्यात जागेबाबत वाद उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांचा तांत्रिक दर्जा राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्यान्वयी यंत्रणेची राहील. मंजूर केलेली कामे विनाविलंब सुरु करावीत. काही अडचणी असल्यास त्वरीत माझे निदर्शनास आणाव्यात. रक्कम विहीत मार्गाने शासन सदरी जमा करणेत यावी. प्रशासकीय मान्यता, निविदा रक्कम या दोहोंपैकी जी रक्कम कमी आहे त्यापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. कामावर बचत झालेली भूकंप प्रवण क्षेत्र असल्यास भूकंप रोधक बांधकामे करण्याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर कामांची माहिती दर्शविणारा फलक कामाच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य आहे. देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेमध्ये वरील अटी व शर्तीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

# बांबू लागवड, उत्पादन व संवर्धनासाठी मोबाईल जनजागृतीचे लोकार्पण

**मुंबई/प्रतिनिधी**



गेल्या काही वर्षात वातावरणात बदल झाले आहेत. त्याचे विपरित परिणाम म्हणून ग्लोबल वॉर्मिंग, अवकाळी पाऊस, गारपीट, अशी संकटे येत आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी बांबू लागवड उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी मोबाईल जनजागृती व्हॅन अर्थात प्राणवायू रथाच्या माध्यमातून शेतकरी, नागरिकांमध्ये जनजागृती होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने फिनिक्स फाऊंडेशन, लातूर यांच्या सहयोगाने बांबू लागवड, उत्पादन व संवर्धन मोबाईल जनजागृती व्हॅन अर्थात प्राणवायू रथाचा लोकार्पण सोहळा आज दुपारी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते वर्षा या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, सहसंचालक डॉ. व्ही. एम. मोटघरे उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, बांबूची शेती पर्यावरण संवर्धनासाठी महत्वपूर्ण आहे. बांबूपासून विविध उत्पादने मिळतात. बांबूपासून अधिकचा ऑक्सिजन मिळतो. तसेच त्याचे कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेण्याचे प्रमाण अधिक आहे. बांबू लागवडीचे प्रमाण वाढून पर्यावरणाच्या रक्षणासाठी शेतकरी, नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी प्राणवायू मोबाईल व्हॅन उपयुक्त ठरेल. महामार्गाच्या दोन्ही बाजूला बांबूची लागवड करण्यात यावी, अशाही सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या. मुंबई शहरात प्रदूषण नियंत्रणासाठी डीप क्लिनिंग मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच मुंबई शहरात रेसकोर्स परिसरात ३०० एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मुंबई पार्क उभारण्यात येईल. तसेच विकास प्रकल्पांची उभारणी करताना ते पर्यावरण पूरक राहतील याचीही दक्षता घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यावेळी प्राणवायू रथाची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच बांबूच्या आर्थिक, पर्यावरणीय मूल्याबद्दल जागरूकता वाढविणे आणि बांबू लागवडीला प्रोत्साहन देणे आहे. हा प्रकल्प लहान व अल्प भूधारक शेतकऱ्यांमध्ये बांबू लागवडीला चालना देत स्थिर, सातत्यपूर्ण आणि शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत प्रदान करेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

18 TO 24 MARCH 2024 - Page 5 (CRIME SANDHYA)8315:Layout 1 3/16/2024 8:15 PM Page 1



# जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांची लूट - राहुल गांधी

**पालघर/प्रतिनिधी**

देशातील आदिवासी दलित इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक नागरिकांची संख्या ८८ टक्के इतकी असून या जनतेला देशातील भागीदारीमध्ये सहभागी करून घेतले जात नाही. याबाबत नागरिक जेव्हा प्रश्न उपस्थित करतील व आपल्या सहभागासाठी लढायला सुरू करतील त्यावेळी देशात खळबळ माजेल, असे प्रतिपादन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वाडा येथे केले. भारत जोडो न्यायात्रेच्या ६२ व्या दिवसाच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथून आरंभ करून जव्हार, विक्रमगड, वाडा येथे लोकांना अभिवादन करत तसेच वाडा येथे चौक सभेत उपस्थितांना संबोधित करून राहुल गांधी यांनी भिवंडीकडे प्रयाण केले. आदिवासी जनतेचे स्थलांतर रोखण्यासाठी असलेल्या मनरेगा योजनेसाठी वर्षाला खर्च होणाऱ्या निधीच्या २५ पट निधी २२ मोठ्या उद्योग समूहाला कर्जमाफीद्वारे देण्यात आला असून सर्वसामान्य नागरिक शेतकरी तसेच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आजवर कर्जमाफी करण्यात आली नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. देशातील उद्योग, आरोग्य, बॉलीवूड, माध्यमसारख्या क्षेत्रांमध्ये देशातील ८८ टक्के असणाऱ्या जनसमुदायाचे प्रतिनिधित्व नसल्याकडे राहुल गांधी यांनी लक्ष वेधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटकासाठी काय केले असा सवाल उपस्थित केला. सर्वसामान्य नागरिकांकडून कर वसुली करताना बलाढ्य मंडळींच्या घशात देशाचा निधी जात असल्याचे त्यांनी आरोप केले. या घटकाला सत्तेमध्ये समप्रमाणत कधी सहभागी करून घेणार अशी विचारणा करत त्यासाठी लढण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.



सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, आदिवासी, दलित व इतर मागासवर्गीय दुर्लक्षित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रथम जातीनिहाय जनगणना करणे आवश्यक असून त्यासाठी आपण मागणी रेटून धरत आहोत. त्याचबरोबरीने विविध संस्था, बलाढ्य उद्योग यांच्यासह आर्थिक सर्वेक्षण करणे गरजेचे असून कराच्या स्वरुपाने गोळा होणारा निधीचा विनियोग कुठे केला जात आहे व सर्वसामान्य नागरिकांना किती लाभ मिळत आहे याचा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. शेतकरी न्याय हमी योजनेच्या पंचसूत्री कार्यक्रमाबद्दल माहिती देत देशातील प्रत्येक कुटुंबाचे किमान उत्पन्न एक लाखापर्यंत आणून देशातील गरिबी हटवण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. देशातील धोरण व त्याची अंमलबजावणी निवडक ९० आयएएस अधिकारी चालवत असून व्यवस्थित बारकावे आपल्याला समजले असल्याचे सांगितले. या वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांमध्ये वंचितांचे प्रतिनिधित्व नाममात्र आहे असे सांगितले. उद्योग धार्जिन्य धोरण सरकार राबवित असल्याची टीका केली. सहा महिन्यांचे प्रशिक्षण देऊन सीमा भागात तैनात करण्यात येणाऱ्या अग्निवीर धोरणाबाबत देखील त्यांनी नापसंती व्यक्त केली. निवडक उद्योग समूहाने शस्त्र व सैन्यासाठी आवश्यक उपकरणांच्या पुरवठ्यामध्ये केलेल्या घुसकोरीबद्दल देखील त्यांनी टिप्पणी केली. या यात्रेला पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात उस्फूर्त प्रतिसाद लाभला. ठिकठीकाणी नागरिकांनी राहुल गांधी यांचे स्वागत केले. राहूल गांधी यांनी ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व तरुण यांच्याकडून अभिवादन स्वीकारले. या यात्रेनिमित्ताने सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता व या यात्रेच्या काळादरम्यान अवजड वाहतुकीवर निर्बंध लादण्यात आले होते.

वाडा येथील खंडेश्वरी नाक्यावर झालेल्या जाहीर सभेत २००० च्या जवळपास नागरिक सहभागी झाले होते मात्र राहुल गांधी यांच्या न्याय यात्रेच्या ताफ्यामध्ये सहभागी झालेल्या गाड्यांची संख्या लक्षणीय होती. देशातील ८८ टक्के लोकसंख्या असलेल्या दलित, मागास आदिवासी, ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व मीडिया, न्यायपालिका, प्रशासनासह सर्वच क्षेत्रात अत्यंत कमी आहे. नरेंद्र मोदी स्वतःला ओबीसी म्हणवतात पण ते ओबीसी नाहीत, ते जनरल कोट्यातले होते, गुजरात सरकारने कायदा बदलला त्यानंतर ते ओबीसी झाले. पण महत्वाचा प्रश्न आहे की, नरेंद्र मोदींनी ओबीसी समाजासाठी काय केले? जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांची लूट सुरु आहे आणि भाजपा सरकार मात्र तुम्हाला म्हणते, आधी रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ, और भूके मर जावो' असा प्रहार काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला. ६ टक्के लोकांच्या हातात न्यायालय, मीडिया, पैसा, सत्ता आहे. जमीन अधिग्रहण करताना गरीब समाज घटकांची जमीन घेतली जाते पण अदानीची एक इंचही जमीन घेतली जात नाही. पंतप्रधान पिक विमा योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही तर कंपन्यांना होत आहे. केंद्र सरकार १६ पिक विमा कंपन्यांना ३५ हजार कोटी रुपये देते हा जनतेचा पैसा आहे. ८८ टक्के लोकांच्या जीएसटीमधून हा पैसा दिला जातो. मात्र अवकाळी पाऊस, गारपीटीने नुकसान झाले तरी शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. सरकारी कंपन्यामध्ये जनतेची भागिदारी होती पण आता सरकारची कामेसुद्धा खासगी कंपन्यांकडूनच केली जातात, त्यामुळे ८८ टक्के समाज घटकांचे प्रतिनिधित्व दिसत नाही. समाजाला मेहनत मजदुरीची कामे करावी लागतात पण ज्या दिवशी हा समाज जागा होईल त्यादिवशी देश हादरेल, असे ते म्हणाले.

## लातूर येथे आबासाहेब पाटील यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबईच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल आबासाहेब पाटील यांचे अभिनंदन करून राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, रामदास पवार, शरद पाटील, सुधाकर सांडूर, प्रताप शिंदे, संतोष सांडूर आदी उपस्थित होते.

## भिवंडीत विज्ञान प्रश्न मंजुषा संपन्न



**भिवंडी/प्रतिनिधी**

शारदा क्लासेस व जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने विज्ञान प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन बी.बी.पाटील इंग्लिश मिडीयम कुरुंद येथे गुरुवारी करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कवी मिलिंद जाधव, बी.बी पाटील स्कूल मुख्याध्यापिका मोनिका मराठे, जीवन विद्या प्रसारक शिक्षण मंडळाचे सहसचिव संजय पटेल, आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद शेलार, जिजाऊ बोरिवली गट प्रमुख पंकज भोईर उपस्थित होते. विज्ञानाची कास धरा, अंधश्रद्धेला खतपाणी घालू नका असे सांगत कवी मिलिंद जाधव यांनी आई मला शाळेला जायचं हाय ही कविता सादर केली. तर पंकज भोईर यांनी विज्ञान प्रश्न मंजुषा बाबत अभ्यासातील फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धी जाधव यांनी केले तर सतीश प्रजापती, विलास भोईर, पंकज भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नालासोपाऱ्यात सांबर शिंगांची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना अटक; पेल्हार पोलिसांची कारवाई




**नालासोपारा/प्रतिनिधी**

पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सांबर या वन्य प्राण्यांच्या शिंगांची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून ६० लाख रुपये किंमतीचे दोन सांबर शिंगे जप्त करण्यात आले आहेत. पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नालासोपारा पूर्वेच्या ॲपल इंडस्ट्री येथे १२ मार्च रोजी दोन व्यक्ती वन्य प्राण्याच्या शिंगाची विक्री करण्याकरीता येणार असल्याची गुप्त माहिती गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस निरीक्षक सोपान पाटील यांना मिळाली होती. त्याची माहिती तातडीने वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना देण्यात आली. त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार तातडीने सापळा रचून आरोपींना अटक करण्यात आली आहे. मोहम्मद इम्रान फरियादअली शाह (४२), अशोक विरजीभाई पटेल (५८) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून त्यांच्याकडून दोन शिंगे, गुन्ह्यात वापरलेली रिक्षा, मोबाईल असा ६० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली पूर्व मुंबई यांच्याकडून लेखी अभिप्राय घेण्यात आला असून त्यांनी सदरचे शिंग हे सांबर वन्य प्राण्याची असल्याचे उघड झाले. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ९, ३९, ४४, ४८ सह भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६ (१) (ड), २६ (१) (आय) ६५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

## भिवंडीत युवक आढावा बैठक संपन्न



भिवंडी : आगामी लोकसभा निवडणुकीत भिवंडी लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने लढविण्यात येणार असल्याचे संकेत दिसत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष लोकसभेत सक्रिय झाला असून गुरुवारी कोनगाव येथे युवक आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, भिवंडी लोकसभा प्रभारी सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा, विभागीय अध्यक्ष विद्याताई वेखंडे, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा डॉ.रूपाली अमोल कराळे, तालुकाध्यक्ष गणेश गुळवी यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आगामी लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी आल्यास संपूर्ण लोकसभेत राजकीय रणनीती आखण्या संदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली असून युवकांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिल्या असून मेहबूब शेख यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत युवकांनी संपूर्ण ताकदीनिशी काम करण्याच्या सूचना दिल्या.

## श्री मारवाडी सेवाभावी संस्थेचे पाणी-पोईचे उद्घाटन

लातूर : येथील मारवाडी स्मशान भूमी मध्ये श्री. मारवाडी सेवाभावी संस्थेच्या वतीने पाणी-पोईचे उद्घाटन करण्यात आले. कडक उन्हाळयात अंत्यविधीसाठी आलेल्या परिजनांसाठी दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी संस्थेच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त मोफत पाणी-पोई सुरूवात करण्यात आली. प्रत्येक दिवशी होणाऱ्या अंतविधीच्या प्रमाणे पाण्याचे जार वाढविण्याची सूचना किशोर लोया, अध्यक्ष मारवाडी सेवाभावी संस्था, लातूर यांनी केली. जनसेवा हीच खरी ईश्र्वर सेवा आहे आणि अशा सेवाचा वारसा मारवाडी सेवाभावी संस्था लातूर चालवत असल्यामुळे मला त्यांचा सार्थ अभिमान आहे. असे उद्गार उद्घाटक लक्ष्मीकांत सोमाणी यांनी काढले. तर आपल्या या कार्याचा आदर्श समाजाने घेऊन समाज हिताचे कार्य करावे अशी अपेक्षा प्रमुख अतिथी गोविंद पारीक यांनी व्यक्त केली. कार्यक्रमासाठी गोपाळ झंवर, राजेंश खंडेलवाल, ईश्वर बाहेती, सुमित ओझा, अंकित पंडीत, अमीत ओझा, मंदू बाहेती, प्रमोद दायमा, सत्यनारायण व्यास, संजय व्यास, रामेश्वर भराडीया, गोविंद वर्मा, दामोदर मालू, सतीष दुरुककर, शरद येडके, मनोज येडके, शेख गोस, सुरज लोंढे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश बिदादा, सुत्र संचलन डॉ. ईश्वरप्रसाद बिदादा तर आभार प्रदर्शन निलेश बांगड यांनी केले.

## देवणी बसस्थानकाचे काम रखडले; बजेट नसल्याचे कारण दाखवून ठेकेदाराचे पलायन?

**देवणी/शकील मनियार**

देवणी येथील बसस्थानक बांधकामासाठी शासनाकडे पैसे नाहीत म्हणून तब्बल चार वर्षे बसस्थानकाचे बांधकाम रखडले होते. त्यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात हाल व हेळसांड होत होती यांचे गांभीर्य लक्षात घेऊन देवणी नगर पंचायत चे उपनगराध्यक्ष अमित मानकरी यांनी देवणी बसस्थानका संदर्भात औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती या याचिकेवर सुनावणी झाली. सदर बसस्थानक बारा तेरा महिन्यात तात्काळ बांधून लोकार्पण करण्यात यावे असे आदेश औरंगाबाद खंडपीठाने दिले असल्याने बसस्थानंकाचे बांधकाम काही दिवस रात्रंदिवस चालू होते आता बसस्थानकाचे काम जवळपास शी टक्के पूर्ण झाले आहे वीस टक्के काम बाकी असतांना सदर ठेकेदाराने हे काम बंद करून ठेकेदाराने देवणीतून पलायन



केले असल्याचे दिसून येत आहे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचे पालन होत की कायद्याचं उल्लंघन हे बघणे गरजेचे आहे. अगदी शेवटच्या टप्प्यात येऊन बांधकाम अचानक कसं काय बंद झालं हा विवेचनाचा प्रश्न आहे. देवणीचे बांधकाम देवणीकराच्या सोयीनुसार झालं नाही तरीही देवणी शहरातील एकही नागरिकाने याल विरोध केलं नाही कारण चार वर्षे बंद अवस्थेत असलेले काम चालू झाला, होउ द्या म्हणून कोणीही काहीच म्हणटले यांचा पुरेपूर फायदा घेऊन सदर ठेकेदाराने अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले आहे यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### उदगीर येथील पोस्ट ऑफिससाठी निधी मंजूर

लातूर : लातूर लोकसभा मतदारसंघातील विविध पोस्ट कार्यालयांच्या विषयी केंद्रीय दूरसंचार राज्यमंत्री मा. देवुसिंहजी चौहान यांना सविस्तर निवेदने देऊन लवकरात लवकर ही पोस्ट कार्यालये नव्याने बांधण्यासाठी मंजुरी व निधीची आग्रही मागणी केली होती. उदगीर येथील १९७६ मध्ये बांधलेल्या जुन्या पोस्ट ऑफिसच्या इमारतीचे नुतनिकरणासाठी मान्यता मिळाली असून नुकतेच त्या बाबतचे आदेश प्राप्त झाले असून रक्कम रुपये ३७,५८,०३१ चा निधी देखील प्राप्त झाला आहे. उदगीरांची अनेक वर्षापासुनची मागणी मान्य झाली.

### अंगद गायकवाड यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार

लातूर : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सामाजिक क्षेत्रात मौलिक कार्य केल्याबद्दल वर्ष २०२१-२२चा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार अंगद गायकवाड यांना मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी अंगद गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रात अनेक वर्षांपासून मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक वंचित आणि गरजू लोकांना मदत मिळाली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली हे निश्र्चितच अभिमानाची गोष्ट आहे, अशा शब्दात गायकवाड यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या मौलिक कार्याची प्रशंसाही आमदार देशमुख यांनी केली.

### शामराव सूर्यवंशी यांना पुरस्कार जाहीर

लातूर : सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामाची दखल घेऊन येथील समाजसेवक शामराव सूर्यवंशी यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारा २०२१-२२ या वर्षीचा कर्मवीर पदमश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार जाहीर करण्यात आला असून याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांनी रुढी परंपरेविरुध्द व अस्पृश्यतेविरुध्द सामाजिक चळवळ उभारली. भूमीहीन शेतमजूर व कामगारांसाठी देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. तसेच त्यांनी पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यामध्ये अत्यंत मोलाची कामगिरी केली. हे कार्य विचारात घेऊन, शासनाने मागील २२ वर्षांपासून दरवर्षी कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांच्या नावाने एक व्यक्ती व एक संस्था यांना पुरस्कार देण्याचे जाहिर केले असून त्यानुषंगाने मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीने लातूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, गोर गरीब, भूमिहीन,दिन दलितांच्या न्याय हक्कासाठी काम करणारे शामराव सूर्यवंशी यांना सन २०२१-२२ या वर्षांकरिता कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार जाहीर करण्यात आला असून मुंबई येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

### शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी गजानन गजानन बोळंगे यांची निवड

लातूर : लातूर येथील अंजनी हॉटेल येथे संपन्न झालेल्या शेतकरी संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत वरिष्ठ पदाधिकार्यांच्या हस्ते पदनियुक्त्या देण्यात येऊन त्यांचे संघटनेत स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या. संघटनेच्या युवा प्रदेशाध्यक्षपदी मिथुन दिवे तर जिल्हाध्यक्षपदी गजानन बोळंगे, जिल्हा सचिव म्हणून राजकुमार नागरगोजे यांची निवड केली आहे. या प्रसंगी शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट, राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे, जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे, मराठवाडा संपर्क प्रमुख महादेव कोठे, युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर उजळंबे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय देवाप्पा तसेच मार्गदर्शक दगडू पडिले यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. जिल्हा उपाध्यक्ष श्रीमंत घुले, जिल्हा युवा आघाडीचे सरचिटणीस सिद्धेश्वर सावंत, लातूर तालुकाध्यक्ष मारूती साळुंके, कार्याध्यक्ष आदीनाथ सूर्यवंशी, निलंगा तालुकाध्यक्षपदी शाहूराज लोभे तर उपाध्यक्षपदी मेघराज रणखांब, रेणापूर तालुका अध्यक्ष सचिन निकम, उपाध्यक्ष अच्युत करमुडे, कार्याध्यक्ष अर्जुन जाधव, देवणी युवा तालुकाध्यक्ष दत्तात्रय अर्जुने, तालुका संघटक शंकर बावचे, सचिव योगेश तगरखेडे, कार्याध्यक्ष करीम शेख आदींसह जिल्ह्यातील तालुकानिहाय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी उपस्थित शेतकरी सदस्यांना व नवनियुक्त पदाधिकार्यांना मार्गदर्शन केले. या बैठकीचे सुत्रसंचलन दत्तात्रय लोभे यांनी केले तर जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांनी आभार मानले.

### महिला दिनी महिलांसाठी सत्र संपन्न

वाडा : उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने महिला शिक्षण व सक्षमीकरण मोहीम योजने अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त बिलघर ग्रामपंचायत कार्यालय येथे महिलांसाठी मासिक पाळीच्या दिवसात घ्यावयाची काळजी, स्वच्छता व सुरक्षितता या बाबत उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या स्मिता पाटील व बिलघर प्रथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. कोमल जगताप यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास बिलघर ग्रामपंचायतीचे सरपंच मोतीराम नडगे, उपसरपंच उमेश दळवी, उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशांच्या समन्वयक सुषमा थोरात यांच्यासह गावकरी महिला उपस्थित होत्या. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने अतिशय स्तुत्य उपक्रम राबवले जात असून असेच कार्यक्रम इतर गावांमध्ये घेऊन महिला व मुलींना मार्गदर्शन करण्याचे आवाहन सरपंच मोतीराम नडगे यांनी केले आहे.

### रिध्दी गायकवाड राज्यात प्रथम

लातूर : दरवर्षीप्रमाणे याही वर्षी घेण्यात आलेल्या मेट्रोबेन अबॅकस सहाव्या नॅशनल लेवल कॉम्पिटिशन २०२४ ॲडव्हांस लेवल परीक्षेमध्ये कु.रिध्दी राहुल गायकवाड ही विद्यार्थीनी राज्यात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल टॉपर ऑफ द टॉपर ट्रॉफी देऊन सिनेअभिनेत्री माधुरी पवार, अभिनेता ओम यादव यांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, लातूर महानगरपालिकेचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, मेट्रोब्रेनचे अध्यक्ष संतोष लोहारे, दूर्गा अबॅकस क्लासेसच्या संचालिका भोसले मॅडम यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

18 TO 24 MARCH 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/16/2024 8:15 PM Page 1



पान १ वरून....

## चारित्र्याच्या संशय प्राणावर...

घटना नागपूर जिल्ह्यातून समोर आली आहे. चारित्र्यावर संशय असल्याने पतीने पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची घटना नागपूर जिल्हातील भिवापूर तालुक्यात उघडकीस आली आहे. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली. तर पैशांसाठी आपल्या मुलीची हत्या केल्याचा आरोप मुलीचे वडील नामदेव ठाटकर यांनी केला आहे. दुर्गा प्रमोद वावरे (वय ३२) असे मृतक महिलेचे नाव आहे. तर प्रमोद कुसन वावरे (वय ४०) असे आरोपी पतीचे नाव आहे. दुर्गाचा पती प्रमोद तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. या कारणावरून त्यांच्यामध्ये अनेकदा भांडणेही होत होती. प्रमोद तिला नेहमी मारहाण करायचा. या त्रासाला कंटाळून ती अनेकदा घर सोडून वडिलांकडे जात होती. ४ मार्च रोजी त्यांच्यात वाद होऊन प्रमोदने दुर्गाला तिच्या वडिलांकडे वडील नामदेव ठाटकर यांच्या घरी भंडारा येथे त्यांच्या घरी नेऊन सोडले होते. तेव्हापासून ती वडिलांच्या घरी होती. त्यानंतर मंगळवारी १३ मार्चला दुर्गा आपल्या सासरी भिवापूरला परत आली. मात्र, पती प्रमोद आणि तिच्या सासू सासऱ्यांनी दुर्गाला घरी परत घेण्यास नकार देत तिला मारहाण केली. दुसऱ्या दिवशी १४ मार्च रोजी सकाळी दुर्गाचा मृतदेह घरात पलंगावर पडलेला आढळून आला. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करत असताना पोलिसांना तिच्या गळ्यावर आणि मानेवर काही खुणा आढळून आल्या, त्यावरून दुर्गाची गळा आवळून हत्या करण्यात आल्याच्या संशयावरून पोलिसांनी तिचा पती प्रमोद कुसन वावरे याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. पंचनामा केल्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी करत आहेत. प्रमोद आणि दुर्गा यांचे २०१४ मध्ये लग्न झाले होते. तेव्हापासून वडिलांकडून पैसे आणण्यासाठी प्रमोद आणि त्याचे आई-वडील दुर्गाला मारहाण करायचे. दुर्गाला दोन मुले आहेत, मधल्या काळात कुटुंबाला हातभार लावण्यासाठी दुर्गाने खासगी नोकरीही केली. मुलीचा त्रास थांबवा यासाठी दुर्गाच्या वडिलांनी अनेकदा पैसेही दिले होते. मात्र, तरीही दुर्गाच्या सासरच्या मंडळींकडून छळ सुरूच होता. पैशांसाठी प्रमोद त्याचे आई-वडील, प्रमोदचा मोठा भाऊ आणि भाची यांनी दुर्गाची हत्या केल्याचा आरोप दुर्गाचे वडील नामदेव ठाटकर यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सर्व दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

## पहिल्याच दिवशी ठेवला पैशावर...

डॉ.अभिनव देशमुख, पोलीस उपायुक्त संजय लाटकर व सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक मेर यांना दिली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी ज्योती शहाच्या घराची, बेडरूमची आणि हत्या झालेल्या जागेची तपासणी केली, परंतु मारेकऱ्यांनी कोणताच पुरावा मागे ठेवला नव्हता. त्यांनी मृतक ज्योती मुकेश शहा यांच्या कुटुंबातील पती आणि मुलीची चौकशी केली. तेव्हा त्यांनी पोलिसांना सांगितले की, आम्ही सर्व तनीया हाईटसमधील २० व्या मजल्यावर राहतो. आमचे बिल्डींग मधील सर्वासोबत चांगलं संबंध आहेत. मी आणि माझे वडील मुकेश शहा मंगळवारी दुपारी दीड वाजेपर्यत घरी होतो. त्यादिवशी सकाळी सात वाजता कैन्हयाकुमार हा घर गडी म्हणून आमच्या घरी पहिल्याच दिवशी कामावर रुजू झाला होता. आठ वाजता दुसरा नोकर त्याचे नियमित काम करून निघून गेला. त्यानंतर दीड वाजता मी आणि माझे वडील दुकानावर निघून गेलो. त्यावेळी माझी आई ज्योती शहा आणि नोकर कैन्हयाकुमार असे दोघेच घरात होते.आईची हत्या झाल्यानंतर घरातील नोकर कैन्हयाकुमार हा देखील बेपत्ता झाला आहे. असे ज्योती शहा यांच्या ४२ वर्षीय मुलीने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी मुलीचा जबाब नोंदवून सविस्तर पंचनामा केला आणि मृतदेह रुग्णालयात विच्छेदनासाठी रवाना केला. नेपियन्सी रोड या सारख्या उच्चभ्रू परिसरातील तहनी हाईटस या इमारतीच्या २० व्या मजल्यावरील सदनिकेत राहणाऱ्या ज्योती शहा या ६३ वर्षाच्या महिलेची हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी लगेच या गुन्ह्यातील आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी वेगवेगळी पथके तयार केली.संशयित आरोपी कैन्हयाकुमार हा घटनास्थळवरून बेपत्ता झाला होता. जाताना त्याने मोबाईल बंद ठेवला होता. त्यामुळे त्याचे लोकेशन मिळत नव्हते. पोलिसांनी घरातील व घरबाहेरील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. तेव्हा तो किचन रुमध्ये ज्योती शहा यांना जेवण बनवताना मदत करीत असल्याचे दिसत होते तर दुसऱ्या फुटेज मध्ये तो ज्योती शहा यांच्या बेडरूम मध्ये घुसताना दिसून येत होता. त्यामुळे ज्योती शहा यांच्या मारेकरी दुसरा कोणी नसून घरातील नोकर कैन्हयाकुमार पंडीत (२०) हा असल्याचे निष्पन्न झाले. घरगडी म्हणून पहिल्याच दिवशी कामावर रुजू झालेल्या कैन्हयाकुमार पंडीत या नोकराने हत्याकडून पलायन केले होते. अखेर मलबार हिल पोलिसांनी बिहारला जाणाऱ्या सर्व गाड्याची माहिती घेतली. तसेच ज्योती शहा याचा खून करून कैन्हयाकुमार हा मुंबई सोडून पटना मेलने गावाकडे रवाना झाला असल्याची माहिती मिळवली. ही गाडी जळगाव जिल्ह्यातील भुसावळ रेल्वे स्थानक परिसरात पोहचली आहे अशी खात्रीपूर्वक माहिती मिळताच मलबार हिल पोलिसांनी भुसावळ येथील आरपीएफ पोलिसांशी संपर्क साधला. आरोपीचे वर्णन असलेला फोटो प्राप्त होताच आरपीएफ पोलिसांनी त्या गाडीत कैन्हयाकुमारचा शोध घेतला.तेव्हा तो मिळून आला. मलबार हिल पोलिसांनी भुसावळ येथे जाऊन आरोपी कैन्हयाकुमारचा ताबा मिळविला. मुंबईत आणून त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्हयाची कबुली दिली. कैन्हयाकुमार पंडीत (२०) असे या अरोपीचे नाव असून तो मूळचा बिहारचा रहिवासी आहे. जेमतेम दहावी शिकलेला कैन्हयाकुमार याने दोन महिन्यापूर्वी याच बिल्डिंग मध्ये काम केले होते, मात्र काही कारणाने त्याला कामातून कमी केले. तहनी हाईटस या इमारतीसमोरच्या समोरील बिल्डिंगमध्ये त्याचे वडील सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. मुलाला कामधंदा नसल्याने त्यांनी कैन्हयाकुमार याला घरगडी म्हणून मुकेश शहा यांच्याकडे कामाला ठेवले.त्याचा एक भाऊ कोफोर्ट मार्केट मध्ये एका दुकानात कामाला आहे. तिघेही बापलेक हे मुंबईत कामधंदा करून पॉट भरतात. दि.१२ मार्च रोजी कैन्हयाकुमार हा शहा यांच्या घरी आला. त्यावेळी घरात शहा यांची मुलगी,पती हे सर्व जण हजर होते. दुपारी दीड वाजता मुकेश शहा आणि त्यांची मुलगी हे आपल्या दुकानात निघून गेले. आता घरात कैन्हयाकुमार आणि ज्योती शहा हे दोघेच होते. ज्योती शहा ह्या बेडरूममध्ये आराम करीत असताना त्याची नजर हिरेजडित बांगड्यावर पडली. त्याने त्या चोरी करण्याचा चंग बांधला. ज्योती शहा या बेडवर डुलकी देत असताना कैन्हयाकुमार याने चोरीच्या उद्देशाने त्यांचा गळा दाबला. त्या मरण पावल्यानंतर त्यांच्या हातातील दोन हिरेजडित बांगड्या घेऊन तो तेथून पळून गेला. कैन्हयाकुमार दुसऱ्याच्या मोबाईलवरून वडिलांना दूरध्वनी केला. ८ मार्चला बिहारहून मुंबईत आलेल्या कैन्हयाकुमार या नोकराला त्याच्याच ओळखीच्या व शहा यांच्याकडे काम करणाऱ्या तरुणाने कामावर ठेवले होते. तर वडीलाने शिफारस केली होती. त्यानुसार मंगळवारी सकाळी सात वाजता कामावर आलेला तो नोकर दुपारी तीन वाजता ज्योती गळा आवळून हत्या केली होती. ज्योती यांच्या हातातील दोन हिरेजडीत बांगड्या गायब होत्या. त्यांची किंमत तीन लाख रुपये आहे. घराबाहेरील सीसीटीव्हीवरून आरोपीच शेवटचा घरातून बाहेर पडल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी दुसऱ्या दिवशी त्याला भुसावळ येथून अटक केली. आरोपी कैन्हयाकुमार पंडित याच्यावर कलम ३०२ खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या तो पोलीस कोठडीत असून जेलची हवा खात आहे.

## करणीच्या संशयामुळे भाचा ...

मयत व्यक्ती हि वृध्द महिला असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांनी पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांना नमुद गुन्हा उघडकीस आणणे बाबत सुचना दिल्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी स्था.गु. शाखेकडील सहा.पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व पोलीस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर यांचे पथकास अज्ञात मयत महिलेची ओळख पटवुन आरोपीचा शोध घेऊन अटक करणेबाबत आदेश केले होते. सदर सुचने प्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व उपनिरीक्षक सुरज निंबाळकर यांनी पथकासह सांगोला परिसरातुन अज्ञात मयत महिलेची माहिती प्राप्त करुन तिची ओळख पटवली. सदर मयत महिलेचे नांव व्दारका बबन माने, रा. धायटी, ता. सांगोला असे असुन ती तिच्या दोन मुला समवेत राहत असल्याचे समजले. सदर महिला हि दि. ११ मार्च २०२४ रोजी धायटी ता. सांगोला येथील तिचे घरातुन त्याच परिसरात राहणारे तिच्या भावाकडे गेली असल्याचे तपासात निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर बाबत सखोल तपास करुन मयत महिला हिचे बाबत गुन्हा उघकीस आणण्याचे दृष्टीने अधिक माहिती प्राप्त केली असता सदर महिलेच्या मृत्यु नंतर तिच्या सख्या भावाचे व त्याच्या मुलांचे वर्तन संशयास्पद असल्याचे लक्षात आले. सदर बाबत अधिक तपास करता मयत हिचा भाचा हा गुन्हा घडल्यापासुन आपले अस्तीत्व लपवुन राहत असलेचे लक्षात आले. सदर गुन्हयातील संशयीत आरोपी याचा सहा.पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व उपनिरीक्षक सुरज निंबाळकर यांनी पथकासह पंढरपुर, सांगोला, अक्कलकोट येथे गोपनीय बातमीदार मार्फत शोध घेत होते. १४ मार्च रोजी गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हा अक्कलकोट मंदिर परिसरामध्ये येणार आहे. नमुद माहिती प्राप्त होताच दोन्ही पथकाने अक्कलकोट येथील मंदिर परिसरामध्ये तसेच बाजार पेठेत शोध घेऊन आरोपीस ताब्यात घेतले. नमुद आरोपीत यास विश्वासात घेवुन त्याच्याकडे गुन्हया संदर्भात कौशल्यपुर्ण तपास केला असता, सदर आरोपीने त्याची मयत आत्या व्दारका बबन माने हि आरोपी व त्याच्या कुंटुबीयावर जादुटोणा करीत होती व त्यामुळे आपल्या कुंटुबाची काही प्रगती होत नसल्याच्या गोष्टीचा मनात राग धरुन अकरा मार्च रोजी सायंकाळी मौजे शीरभावी, ता.सांगोला गावाचे लगत असलेल्या वन विभागाच्या जागेत घेवुन जावुन चाकुने वार करुन व दगडाने डोके ठेचुन खुन केल्याचे कबुल केले आहे. सदर आरोपीस १४ मार्च २०२४ रोजी अटक केली असुन, पुढील तपास पोलीस निरीक्षक खणदाळे सांगोला पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व पोलीस उप-निरीक्षक सुरज निंबाळकर यांच्या पथकातील पोसई राजेश गायकवाड, सपोफौ. श्रीकांत गायकवाड, पोहेकॉ.सलीम बागवान, हारिदास पांढरे, विजयकुमार भरले, पोना. धनराज गायकवाड, पोकॉ. यश देवकते, समर्थ गाजरे तसेच अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे कडील पोलिसांनी बाजवली आहे.

## ठरणार होता म्हातरपणीचा आधार...

हे मोठ्या लोकसंख्येचे गाव. या गावात प्रल्हाद झिंगराजी भुतेकर यांचे कुटुंब रहाते. प्रल्हाद भुतेकर, त्यांच्या पत्नी चंद्रभागा, तीन मुले श्रीकांत, माधव, किरण आणि एक मुलगी असा हा परिवार आहे. प्रल्हाद यांच्या सर्व मुलांचे बिवाह झाले असून सर्व जण आपापल्या संसारात सुखी आहेत. भुतेकर यांच्याकडे तीन एकर शेती असून त्यावर ते कुटुंबाचा गाडा हाकत होते. श्रीकांत व किरण दोन्ही मुले जुन्या जागेत प्रल्हाद यांच्याच शेजारी विभक्त रहायचे, हे दोघेही हातमजुरीसह काम-धंदा करून आपापले प्रपंच चालवत होते. सर्वात धाकटा किरण गावातच कळस्कारवाडी येथे रहायचा. सर्वात धाकटा किरण लहानपणापासूनच उद्धट आणि भांडखोर होता. लहान वयातच त्याला दारूचे व्यसन लागले. दारू घेतल्यावर तो कुटुंबासह गावात नसत्या उचापती करत असल्याने प्रल्हाद यांनी त्याचे लग्न करून दिले होते. किरण पत्नीसह कळस्कारवाडीतवेगळारहात होता. वेगळा रहात असला तरी मद्यप्राशन केल्यावर वाद करणे, कुटुंबास त्रास देणे हा प्रकार कमी झालाच नव्हता. मिळेल ते काम करणे व दारू पिऊन दंगा करण्याचा त्याचा सिलसिला कायम होता. किरणने एक वर्षापूर्वी दारूच्या नशेत जन्मदात्या बापास बेदम मारहाण केली होती, तेंव्हापासून त्याच्या घरातील सदस्य किरणसोबत बोलणेच टाळत होते. किरण आई-वडील, भाऊ यांचा खूप राग करायचा, स्वतः दारूत पैसा खर्च करायचा आणि वडील भावांच्या प्रगतीवर जळायचा. त्यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागायचा, पैसे न मिळाल्यास अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून त्यांची मानहानी करायचा. किरणच्या स्वभावास त्याचे आई-वडील, भाऊ खूप कंटाळले होते. दोन महिन्यापूर्वी किरणच्या पत्नीचं निधनझाले होते, त्यानंतर तो अभिषेक व हृषीकेश या दोन मुलांसह रहात होता. पत्नीच्या निधनापासून त्याचे दारू पिण्याचे प्रमाणही वाढले होते. तसेच आई- वडील, भाऊ यांच्याबाबतचा आकसही वाढला होता. किरणचा जन्म झाल्यावर, आता तीन भाऊ एकमेकांचा आधार होतील म्हणून प्रल्हाद व चंद्रभागाबाई यांना आनंद झाला होता. हलाखीच्या परिस्थितीसोबत चार हात करत, सुरू असलेला संघर्ष तिसऱ्या मुलाचा जन्म झाल्यावर कमी होईल अशी आशा ठेवत त्याच्याकडे आशेचा किरण म्हणून पहात, त्याचे नावही 'किरण' ठेवले होते. पण किरणच्या त्रासदायक वागण्यामुळे कदाचित त्याला जन्म देऊन आपण गुन्हाच केला असे त्याच्या माता-पित्यास वाटत होते.गुरूवार दि. ८ फेब्रुवारी रोजीसंध्याकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान किरण खिशात धारदार चाकू घेऊन दुचाकीने वायटी चौकातील घरी आला. घरी आई चंद्रभागा होती. आईकडे किरणने दारू पिण्यासाठी पैसे मागितले, तेंव्हा चंद्रभागा यांनी माझ्याकडे पैसे नाहीत म्हणत पैसे देण्यास नकार दिला. आई दारूसाठी पैसे देत नसल्याने किरण चवताळला. त्याने खिशातला धारदार चाकू काढून मागचा-पुढचा विचार न करता जन्मदात्या आईच्या पोटात डाव्या बरगडीजवळ ताकदीने चाकूचा वार केला. या वाराने रक्ताची धार लागली. वृद्ध आईने आरडाओरड केली, तेंव्हाकिरणचा मोठा भाऊ पळत आईच्या खोलीत आला. आई जखमी अवस्थेत पडली होती. जखमेतून भळाभळा रक्त वहात होते. ज्या पोटातून जन्म घेतला, त्याच पोटावर चाकूचा बार करतांना किरणचे हात जराही थरथरले नाहीत. आईच्या दुधाच्या कर्जाची परतफेड त्याने चाकू मारून केली. त्या माय माऊलीने अमृताचा पान्हा पाजला, त्याच माऊलीला दारूला पैसे दिले नाहीत म्हणूनचाकूने घायाळ करत त्याने तेथूनपळ काढला. सायंकाळचे ६.०० वाजले असावेत. डोणगांवमधील बॉर्ड नं. २ वायटी चौकातील प्रल्हाद भुतेकर यांच्याघरी आरडाओरड आणि रडारड सुरू होती. भुतेकर कुटुंबियांचा आक्रोश ऐकून आजूबाजूच्या शेजाऱ्यांसह गावकऱ्यांनी त्या घराकडे धाव घेतली. घरातील दृश्य पाहून सारेच अवाक् झाले. ६८ वर्षीय चंद्रभागाबाई भुतेकर रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. लहान मुलगा किरणनेच दारूच्या नशेत चंद्रभागाबाई यांना धारदार चाकू मारला होता. गंभीर जखमी चंद्रभागाबाई यांना दवाखान्यात हलवण्यासाठी धावाधाव सुरू झाली. खाजगी वाहनाने गंभीर जखमी चंद्रभागा यांना मेहकर येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनकअसल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना संभाजीनगरला हलवण्याचा सल्ला दिल्यामुळे नातेवाईकांनी गंभीर जखमी चंद्रभागाबाई यांना संभाजीनगर येथील एम्स रुग्णालयात दाखल केले.

पैशाची जुळवाजुळव करण्यासाठी चंद्रभागाबाई यांचा मुलगा माधव घरी परतला. आईला चाकू मारल्याने रागावलेल्या माधवनेलहान भाऊ किरण यास जाब विचारला, तेंव्हा मद्यधुंद किरण भुतेकर चवताळला. त्याने जाब विचारणाऱ्या मोठा भाऊ माधवलाही लोखंडी रॉडने मारहाण केली. या मारहाणीत माधव जखमी झाला. त्याने सरळ डोणगांव पोलीस स्टेशन गाठून फिर्याद दाखल केली. माधव भुतेकर (वय ३५) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी किरण भुतेकर (वय ३२) याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्वरित संशयित आरोपी किरणला अटक केली. दि. १० तारखेस स्थानिक न्यायालयासमोर संशयित आरोपीस उभे केले असता न्यायालयाने संशयितास ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. एम्स रुग्णालयातील डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केल्यावरही १० तारखेला दुपारी ४ वाजता गंभीर जखमीचंद्रभागा यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उत्तरीय तपासणीनंतर मोठ्या शोकाकुल वातावरणात चंद्रभागाबाई यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांनी गुन्ह्यात कलम ३०२ समाविष्ट केले. पोलीस तपासात दिवट्या मुलाने दारूच्या पैशासाठी जन्मदात्या आईच्या पोटात चाकू मारून आईचा निर्घृण खून केल्याचे उघड झाले. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक अमर नागरे, पोलीस नाईक सतिश मुळे, पोलीस कॉन्स्टेबल आनंद चोपडे, ज्ञानेश्वर घायाळ, पवन गाभणे करत आहेत.

## शुल्लक कारणावरून बाईकस्वारांनी...

केला. प्रति हल्ल्यामध्ये अश्विन कुमारने देखील एकाच्या डोक्यात फरशी घातली. त्यामुळे वाद पुन्हा विकोपाला गेला. यावेळी झटापटीत एकाने अश्विन कुमारच्या पोटात धारदार हत्याराने खुपसले. हा हल्ला होताच गणेश हाताळे हा देखील भांडण सोडण्यासाठी मध्ये आला. त्यामुळे संशयितांनी त्याच्यावर देखील हल्ला केला. हत्याराचा पोटात वर्मी घाव बसल्याने अश्विन कुमार मुळके हा जागेवरच कोसळला. किरकोळ कारणावरुन झालेल्या वादावादीतून अश्विन कुमारचा खून झाल्याने मयताच्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत संशयित हल्लेखोरांना तातडीने अटक करण्याची मागणी केली. त्यानुसार पोलिसांनी देखील अजय खोत, सुजित चंदनशिवे, कुणाल पवार, विकी पवार, गणेश ऐवळे, अमोल कुंचीकोरवी आणि अर्जुन पवार यांना कर्नाटकातून अटक केली आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## महिला दिनाचे औचित्या साधून महिलांसाठी सत्र संपन्न

वाडा : उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने महिला शिक्षण व सक्षमीकरण मोहीम योजने अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त बिलघर ग्रामपंचायत कार्यालय येथे महिलांसाठी मासिक पाळीच्या दिवसात घ्यावयाची काळजी, स्वच्छता व सुरक्षितता या बाबत उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या स्मिता पाटील व बिलघर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ.कोमल जगताप यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास बिलघर ग्रामपंचायतीचे सरपंच मोतीराम नडगे, उपसरपंच उमेश दळवी, उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशांच्या समन्वयक सुषमा थोरात यांच्यासह गावकरी महिला उपस्थित होत्या. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने अतिशय स्तुत्य उपक्रम राबवले जात असून असेच कार्यक्रम इतर गावांमध्ये घेऊन महिला व मुलींना मार्गदर्शन करण्याचे आवाहन सरपंच मोतीराम नडगे यांनी केले आहे.

पान ८ वरून....

## सप्तफेरे सेवाभावी संस्था...

शिस्तबद्ध आयुष्य घडविण्यासाठी समाज घडवणार्या सज्जनांचे संगोपन करा असे सांगितले. आजकाल चांगली बोलणारी, वागणारी माणसे फार कमी आहेत आणि अशी माणसे समाजासमोर आणण्याचे काम सप्तफेरे वधू-वर सूचक केंद्र करत असल्याचेही ते म्हणाले. माणसाने संगत ही सज्जनाची करावी. चांगल्या माणसांच्या संगतीत माणुस राहिला तर माणसाच्या जगण्याचे सार्थक होते. सप्तफेरे वधूवर सुचक केंद्राच्यावतीने दिले जाणारे पुरस्कार हे अशाच चांगल्या व्यक्तींना दिले जातात हे पहात आहे. संजय राजुळे या माणसाला सामाजिक कार्य करण्याचा छंद असल्याचेही त्यांनी यावेळी बोलून दाखविले तर आरसीसीचे संचालक शिवराज मोटेगावकर यांनी संजय राजुळे हे अथक परिश्रम करणारे, निस्वार्थ भावनेने कार्य करणारे व्यक्ती असुन ते नेहमीच आडल्या-नडलेल्यांना मदत करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले तर पुढच्या वर्षी आणखी थाटामाटात अशाच समाजातील चांगल्या व्यक्तींचा सन्मान करतील अशी आशा प्रा.शिवराज मोटेगावकर यांनी व्यक्त केली. तर संजय राजुळें सारख्या व्यक्तींची आज समाजाला गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी दापक्याचे सरपंच व्यंकटराव पाटील दापकेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले तर वृक्षमित्र सुपर्ण जगताप यांनीही प्रत्येकाने वृक्ष लागवड करावी. वृक्ष लागवड करणे किती गरजेचे आहे याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील २० व्यक्तींना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उमेश खोसे, वैष्णवी वाघ यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधव तरगुडे, विरभद्र तरगुडे, बालाजीअप्पा पिंपळे, गंगाधर डिगोळे, रविकिरण सुर्यवंशी, लहु शिंदे, विद्यासागर पाटील, संतोष सोनवणे, अमोल घायाळ, गुरुराज माळेवाडे, साईनाथ घोणे, शंकर हामपल्ले, अमित खराबे आदींनी परिश्रम घेतले. सप्तफेरे वधू-वर सूचक केंद्राचे संस्थापक सचिव माधव तरगुडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## केशवसृष्टी ग्राम विकास योजनेअंतर्गत...

निमित्ताने २० संकुलात वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले गेले. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, गायन स्पर्धा ,वकृत्व स्पर्धा पारंपारिक नृत्य (तारपा व गौरी नाच) घेण्यात आले व प्रोत्साहनात्मक त्या महिलांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यागावातील समाजात काम करणाऱ्या किंवा गावात आदर्श असणाऱ्या अशा विशेष महिलांचा सन्मान करण्यात आला. मुंबई येथील प्रमुख लाभलेल्या महिला वक्ता यांचे महिलांना मार्गदर्शन केले. केशवसृष्टि ग्रामविकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विक्रमगड येथील बांबू हस्तकला प्रकल्पाची प्रेरणादायी यशस्वी यशोगाथा सादर केली. या कार्यक्रमाचे अवचित्य साधून केशव सृष्टी ग्रामस्वास्थ विभागाकडून किशोरी व महिला विकास या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्ताविक व समारोप त्या त्या गावातील महिलांनीच केले आहे.

सदर कार्यक्रमात सुनयना नटे, डॉ.अलका मांडके, अर्चना वाडे, डॉ. सुभदा धारूरकर, रश्मी भातखळकर, डॉ.शितल शिंदे, मंजू खरात, लीना मालविया, शैल बाला सिंह यांचेसह विविध क्षेत्रातील सुमारे दोनशेहून अधिक महिला मुंबईहून आल्या होत्या. तसेच प्रत्येक गावातील प्रतिष्ठित मान्यवर, सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## आय.टी.इन्होव्हेटिव प्रयोगशाळा...

अनुभव प्रदान करून, ही प्रयोगशाळा ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आणि नवकल्पना स्वीकारण्यासाठी सक्षम बनविण्याचे उद्दिष्ट ठेवते. तसेच करिअर फाऊंडेशन लर्निंग सेंटर द्वारे इंटरक्टिव्ह क्लासरूमच्या सहाय्याने जेईई, नीट सारख्या स्पर्धा परीक्षांचा पाया मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. यासाठी माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संदीप अगरवाला यांच्या नेतृत्वाखाली रोटरी क्लब ऑफ बॉम्बेचे माजी अध्यक्ष विनीत भटनागर आणि सदस्यांसह दि वाडा को ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि रोटरी क्लब ऑफ वाडाचे सहकार्य लाभले आहे. तर महानसरिया गृपचे योगेश महानसरिया यांनी संपूर्ण निधी उपलब्ध करून दिला आहे. शिक्षण, नावीन्य आणि संधी याद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या मोहिमेला सुरुवात करत असताना या परिवर्तनाच्या प्रवासात रोटरी नेहमी विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहील. एकत्रितपणे, एक उज्ज्वल भविष्य घडविण्यात, जिथे प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या भौगोलिक स्थानाची पर्वा न करता, समाजाच्या प्रगतीमध्ये भरभराट करण्याची आणि योगदान देण्याची संधी निर्माण करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नेहमीच तयार असेल. तसेच या विद्यार्थ्यांमधून जर कोणी आयआयटी साठी पात्र झाले तर त्याला संपूर्ण स्कॉलरशिप बॉम्बे क्लबकडून देण्याची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी योगेश महानसरिया, संदीप अगरवाला, पोलिस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे, मनोज पतोडिया, विनीत भटनागर, शशांक ठाकरे, श्री नंदी, मुख्याध्यापक उमेश भानुशाली सर आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबरोबरच निखिल संघाई, भगवान पाटील, प्रशांत पाटील, श्रीकृष्ण सोनटक्के, श्रिकांत आंबवणे, मधुकर भानुशाली, बी. के. पाटील सर याबरोबरच रोटरी क्लब ऑफ वाडाचे सदस्य, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा सेवा संघातर्फे महिला ...

रेखा राजगुरु, शुभांगी खरबस, लता बनसोडे, नंदा तरटे, सुजाता यादवाड, ज्योती लामकाने, रुतिका लिंगराज, अन्नपुर्णा वस्त्रद, मंदाकिनी चव्हाण, सुनिता लांबतुरे, शमा तांबोळी, यशवंती धत्तुरे, अर्चना कणकी, प्रतिक्षा गोडसे, दिपाली व्हटे, शितल पडसळकर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा सेवा संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, अनिल जगताप, सचिन साळुंखे, सुधाकर माने देशमुख, सचिन जाधव, सचिन चव्हाण, चेतन भोसले, रोहीत घुले, अजित देशमुख, विशाल घोगरे, संजय चव्हाण, विठ्ठल मलपे, उमेश खंडागळे, प्रकाश शेंडगे, अभिजीत निचळ, संतोष नीळ, गणेश साळुंखे, विकास भांगे, ऋषिकेश जाधव, रवि पाटील, राम चव्हाण, गणेश वटवटवाले, मुशीर कलादगी, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अविनाश गोडसे यांनी केले.

## स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून भावी...

शिवलिकाताई हाके, भाजपा प्रदेश सदस्य दत्तात्रय जमालपुरे, प्राचार्य डॉ.वसंत बिराजदार, केंद्रप्रमुख नंदकुमार कोणाले, परमेश्वर पाटील, सरपंच रमेश कांबळे, भाजपाचे उपाध्यक्ष संतोष कोटलवार, भाजपाचे तालुका सरचिटणीस माणिक नरवटे, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. स्नेहसंमेलनाचा शुभारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत ज्ञानेश्र्वर माऊली आणि कै.अशोकराव हाके- पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.वार्षिक स्नेहसंमेलन सकाळी दहा वाजता सुरू झालेले तब्बल आठ तास अविश्रांतपणे चालले. यात श्रीराम प्रभू देखावा, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, शाहिरी, जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा समाजसुधारकांच्या जीवनावर एकांकिका, नाटिका, भारुड, भावगीत, भक्तीगीत, लोकगीते, लावणी, हिंदी, मराठी गीते, विडंबन आणि रिमिक्सच्या गीताने रसिकांची मने कलाकारांनी जिंकले.यावेळी रेखाताई तरडे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, दिलीपराव देशमुख यांची मनोगत पर भाषणे झाली. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आशा रोडगे-तत्तापूरे यांनी तर सूत्रसंचालन सतीश साबणे, शारदा तिरुके, यांनी केले आणि आभार मीना तोवर यांनी मानले.

## राहुल गांधी यांचे वाड्यात जल्लोषात ...

दृष्टिकोनातून वाडा शहरात प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचा फौजफाटा सज्ज ठेवण्यात आला आहे. संभाव्य वाहतूककोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत बदलही करण्यात आले होते.

# काशिमीरा पोलीस ठाण्याचे विभाजन; नवीन काशिगाव पोलीस ठाण्याची निर्मिती




**वसई/प्रतिनिधी**

मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील काशिगाव या नव्या पोलीस ठाण्याचे गुरूवारी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दुरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. काशिमीरा पोलीस ठाण्याचे विभाजन करून या पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. आयुक्तालयातील हे १८ वे पोलीस ठाणे आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली. त्यावेळी सुरुवातीला १३ पोलीस ठाणे कार्यान्वित होते. त्यावेळी ७ पोलीस ठाणी नव्याने निर्माण करणे प्रस्तावित होते. मागील ३ वर्षात आचोळे, मांडवी, पेल्हार आणि नायगांव या ४ पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याती आली. आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांची संख्या आतापर्यंत १७ होती. आज पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पो. ठाण्याचे विभाजन करुन १८ व्या काशिगांव पोलीस ठाण्याचे उद्घाटन पार पडले. काशिगाव पोलीस ठाण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून इमारतीचा तळमजला भाडेतत्वावर प्राप्त झाला असून त्याचा भाडेखर्च पोलीस आयुक्तालयाच्या शासकीय निधीतुन करण्यात येणार आहे. तसेच या ईमारतीच्या अंतर्गत सजावटीसाठी ठाण्याच्या जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळाला आहे. काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्ह्यांची संख्या प्रचंड होती. २०२३ मध्ये काशिमीरा पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्यांची संख्या ८०० तर अदखलपात्र गुन्हयांची संख्या ३ हजार १७० एवढी आहे. काशिगाव पोलीस ठाण्याच्या निर्मीतीमुळे काशिमीरा पोलीस ठाणे अंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांपैकी सुमारे ५० टक्के गुन्हयांचे विभाजन होईल आणि नागरिकांना न्याय देता येईल असा विश्वास पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार राजन विचारे, आमदार गिता जैन, माजी आमदार, मुजफर हुसैन, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त संजय काटकर उपस्थित होते. काशिगांव पोलीस ठाण्याची निर्मिती मुळ काशिमीरा पोलीस ठाण्याचे विभाजन करून करण्यात आली आहे. मूळ काशिमीरा पोलीस ठाण्याचे एकुण क्षेत्रफळ २९.९० चौरस किलोमीटर होते. त्यापैकी सुमारे २० चौरस किलोमीटर एवढे क्षेत्रफळ काशिगांव पोलीस ठाण्याकडे वर्ग झाले असून काशिमीरा पोलीस ठाण्याचे क्षेत्रफळ सुमारे ९.९० चौरस किलोमीटर एवढे आहे. नव्या काशिगाव पोलीस ठाण्याच्या पूर्वेस वरसावे खाडीचा परिसर व वरसावे कडून ठाणेच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या कासारवडवली पोलीस ठाणे हद्दीपर्यंतचा भागाचा समावेश आहे. पश्चिमेकडे शांतीवन सोसायटी. जी.सी.सी. क्लब रोड रित पॅराडाईजस ते हरीया डिम पार्क या दरम्यान असलेला रस्ता, तसेच मिरा-भाईंदर रोडची महेश इंडस्ट्रियल इस्टेट ते काशिमीरा नाका या दरम्यान असलेली पूर्ववाहीनी मार्गीका आहे. दक्षिणेस मनाली गाव, काशिगाव, जरी मरी मंदीर रोड व त्याला लागून असलेला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा कासारवडवली पोलीस ठाणे हद्दीपर्यंतचा परिसर. आणि उत्तरेस शांतीवन सोसायटी, जी.सी.सी. रोड, १५ नंबर बसस्टॉप, मनपा. मलनिस्सारण प्रकल्प आदींचा समावेश आहे. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## जायंटस ग्रुपतर्फे महिलांसाठी बाईक रॅलीचे आयोजन



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात जायंटस ग्रुप ऑफ भिवंडी, सहेली जायंटस ग्रुप ऑफ भिवंडी मेट्रो सहेली जायंटस ग्रुप ऑफ भिवंडी या सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून रविवारी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय जलतरणपटू सायकल पटू निता बोरसे व अभिनेत्री व योगा प्रशिक्षक वैजयंती जोशी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. अवयव दान, बेटी बचाव बेटी पढाओ, वृक्ष वाचवा पाणी वाचवा, किचन ते अंतरीक्ष या आदी विषयां वरील प्रतिकृती या प्रसंगी महिलांनी साकारल्या होत्या. या बाईक रॅलीत शहरातील विविध भाषिक ३०० महीला सहभागी झाल्या होत्या. ही बाइक रॅली यशस्वी करण्यासाठी जायंटस वेल्फेअर फाऊंडेशन फेड एक च्या उपाध्यक्षा मनीषा भांगरे, जायंटस ग्रुप ऑफ भिवंडी मेट्रो सहेली अध्यक्षा काजल जांजयानी, बाईक रॅली आयोजन समितीच्या पूनम केणे, पूजा थाळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## ७८० भटक्या श्वानांना अँटीरेबीज लसीकरण
## शहरातील भटक्या श्वानांचा त्रास कमी होणार

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील श्वानांची वाढती संख्या व त्यामुळे वृद्ध नागरिक, लहान मुले आणि महिलांना होणारा त्रास लक्षात घेता मनपाच्या वतीने अँटीरेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आतापर्यंत ७८० भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले असून आपल्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा त्रास असेल तर संपर्क साधण्याचे आवाहन मनपा व उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. लातूर शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे वृद्ध नागरिक, लहान मुले व महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा ही भटकी कुत्री नागरिकांना चावा घेऊन जखमी करत आहेत. हा त्रास कमी करण्यासाठी भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनपाकडून मुलुंड येथील ग्लोबल फाउंडेशनच्या सहकार्यातून अँटीरेबीज लसीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत लसीकरण करून कुत्र्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी सोडण्यात येते. कुत्र्यांचा वाढता त्रास लक्षात घेता ही प्रक्रिया अधिक परिणामकारक व गतिमान करण्याचा निर्णय महानगरपालिकेकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार



एप्रिल महिन्यापासून दर शनिवारी अँटीरेबीज लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे. सध्याही प्रभाग निहाय लसीकरण केले जात आहे. ज्या भागात भटक्या कुत्र्यांचा त्रास अधिक आहे त्या भागातील नागरिकांनी उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या ८६५५३२३१६८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यानुसार माहिती घेऊन त्या-त्या परिसरात दर शनिवारी अँटीरेबीज लसीकरण करणे शक्य होईल. नागरिकांनी आपल्या भागातील भटक्या श्वानांची माहिती त्या क्रमांकावर द्यावी. यामुळे शहरातील नागरिकांना होणारा त्रास कमी करणे शक्य होईल, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका व उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## कै.रसिका महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन




**देवणी/प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरण २०२०च्या अंमलबजावणीसाठी पारंपरिक शिक्षणासोबतच कौशल्याधारित वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे कौशल्य मिळणे काळाची गरज आहे यासाठी केंद्रशासन आणि महाराष्ट्र शासनाच्या संकल्पनेतून कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगार क्षमतेचे वृद्धी, औद्योगिक आस्थापनांच्या गरजेनुसार प्रशिक्षण सॉफ्ट स्कीलचे प्रशिक्षण, स्किल गॅप नुसार कौशल्य विकास प्रशिक्षण, वंचित गरजू विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण, जागतिक स्पर्धात्मक तयारीसाठी तंत्रज्ञानाचा प्रगतीचा अवलंब करणे यासाठी देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयात महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त 'महाविद्यालय कौशल्य विकास' केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. महाविद्यालय कौशल्य विकास केंद्र महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर यांचे मार्गदर्शन आणि सकारात्मक प्रयत्न लाभले आहेत.

लातूर येथील सेवा योजना कार्यालयाचे ज्ञानेश्वर कांबळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन कोर्सेस बाबत सविस्तर माहिती दिली व जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी या विविध कोर्सेसना प्रवेश घ्यावा असे आवाहन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.गोपाल सोमानी यांनी केले.

## स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाश्वत स्वच्छता टिकविण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन



**पालघर/प्रतिनिधी**

गावातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने संपूर्ण ग्रामिण स्वच्छता व शाश्वत स्वच्छता टिकविणे आणि हागणदारीमुक्त अधिकची स्थिती कायमस्वरुपी राखणे याकरीता घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. या अनुषंगाने गावपातळीवरील निवडक ५ प्रतिनिधीचे दोन दिवसाचे प्रशिक्षण जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. यानुसार पालघर जिल्हयासाठी साई प्रेम ग्रामिण विकास संस्था यांची राज्यस्तरांवरुन नियुक्ती करणेत आली आहे. सदर संस्थेला जिल्हयाचे कार्यक्षेत्र देणेत आले आहे. प्रकल्प संचालक (स्व.भा.मि.) जिल्हा परिषद यांच्या समन्वयाने क्षमता बांधणी प्रशिक्षण कृती आराखडयानुसार प्रशिक्षणाचे तुकडी निहाय सपूर्ण प्रशिक्षणांचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षणाचा डहाणू तालुक्यात शुभारंभ करण्यात आला आहे. मानवी जीवनामध्ये स्वच्छतेचे महत्व, घनकचरा व्यवस्थापन घरगुती व सार्वजनिक स्तरावरील घनकचरा संकलन काढण्याचे प्रमाण, घनकचरा व्यवस्थापनाकरिता गावपातळीवर प्रक्रिया व संस्थात्मक यंत्रणा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता करावयाच्या उपायोजना किंवा उपक्रम सांडपाणी व्यवस्थापन घरगुती व सार्वजनिक स्तरांवरील सांडपाणी संकलन काढण्याचे प्रमाण, सांडपाणी व्यवस्थापनाकरिता गावपातळावर प्रक्रिया व संस्थात्मक यंत्रणा, सांडपाणी व्यवस्थापना करिता करावयाच्या उपाययोजना किंवा उपक्रम, चित्रफितीव्दारे प्रबोधन, गाव कृती आराखड्याची माहिती व तयार करावायाची पध्दत इत्यादी विषयावर प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचा गावामध्ये शाश्वत स्वच्छता टिकविण्यास मदत होणार आहे, असे अतुल पारसकर यांनी सांगितले.

## अंबरनाथमध्ये सिग्नल यंत्रणा चालू

**अंबरनाथ/प्रतिनिधी**

वाहन वर्दड मुळे वाहतूक कोंडी होत होती. याच वाहतूक कोंडीवर पर्यायखातर मुख्य चौकात सिग्नल यंत्रणा चालू करण्यात आली. कल्याण बदलापूर रोड अंबरनाथ मधून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ये जा करण्यासाठी वाहणाची खूप मोठया प्रमाणात वर्दड असते. वाहन हे गरजेचे असल्यामुळे वाहनाच्या संख्येतमोठी वाढ दिसून येत होती.पण या वर्दड मुळे वाहतूक कोंडी होत होती. पदाचारी जाणाऱ्या लोकांना सुद्धा रस्ता पार करणे अवघड होत होते. अंबरनाथ स्टेशनला जाण्यासाठी रोड पार करणे सुद्धा अवघड होत होत. बरेचदा रेल्वे स्टेशन कडे वळण घेताना बरेच अपघात होत होते. जनतेला होणारा त्रास कसा कमी होईल याच अनुषंगाने अंबरनाथ मधील मुख्य चौकात मटका चौक, रेल्वे स्टेशन कडे जाणारा रस्ता, फातिमा स्कूल कडे जाणारा रस्ता, फ़ॉरेस्ट नका, अश्या चार ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविण्यात आले व अंबरनाथ विधानसभा आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या हस्ते उदघाटन करून चालू करण्यात आले. अंबरनाथ मध्ये एकूण दहा ठिकाणी सिग्नल लावण्यात येणार आहे.बाकी उर्वरित सहा सिग्नलचे काम सुद्धा चालू आहे.असे नगरपालिकेचे मुख्य अधिकारी रसाळ सर व आमदार यांनी सांगितले. सिग्नल उदघाटना वेळी माजी नागराध्यक्ष सुनील चौधरी, रसाळ सर व अधिकारी उपस्थित होते.

## नालासोपाऱ्यात गटारात अडकून महिला जखमी

**नालासोपारा/प्रतिनिधी**

वसई विरार मधील विविध ठिकाणी अजूनही उघडी व तुटलेल्या अवस्थेतील गटारांची झाकणे आहेत. याचा फटका नागरिकांना बसत आहे. नुकताच नालासोपारा येथील रहेमत नगर येथे एका महिलेचा पाय अडकून जखमी झाली आहे. वसई विरार शहरात सांडपाणी निचरा होण्यासाठी विविध ठिकाणी गटार व्यवस्था करण्यात आली आहेत. त्यावर पालिकेने सुरवातीला झाकणे बसविली होती. परंतु त्यांची देखभाल दुरुस्ती योग्य रित्या होत नसल्याने अजूनही अनेक ठिकाणी गटारांची झाकणे उघडी व तुटलेल्या अवस्थेत आहे.

या ठिकाणाहून ये जा करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका कायम आहे. या उघड्या गटारांच्या दुरुस्तीकडे पालिकेने दुर्लक्ष केले असल्याने अपघाताच्या घटनाही समोर येऊ लागल्या आहेत. नालासोपारा प्रभाग समिती ब मधील रेहमत नगर येथे गटाराचे झाकणे उघडे असल्याने नुकताच फुटपाथ वरून चालत जाताना महिला त्यात अडकून जखमी झाली आहे. उघड्या गटारामुळे शहरात अनेक अपघात घडले आहेत. अशी स्थिती असतानाही




महापालिकेने विविध प्रभागातील गटाराच्या झाकणांच्या दुरुस्तीकडे पालिकेने लक्ष दिलेले नाही. पालिकेने शहरातील गटार व्यवस्थेचे सर्वेक्षण करून दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

### आदिवासी विकास विभाग ६१ अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्यास मान्यता

मुंबई : राज्यातील ६१ आदिवासी अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. १७ अनुदानित प्राथमिक आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा म्हणून २०२४-२५ पासून श्रेणीवाढ करण्यात येईल. तसेच २०२४-२५ पासून इयत्ता ८ वी, २०२५-२६ पासून इयत्ता ९ वी आणि २०२६-२७ पासून १० वीचा वर्ग सुरु करण्यात येईल. ४४ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालय (कला व विज्ञान) सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ठिकाणी २०२४-२५ पासून ११ वी, २०२५-२६ मध्ये १२ वीचे वर्ग सुरु करण्यात येतील. आदिवासी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे तसेच मुलींमध्ये शिक्षणाची गोडी वाढावी यासाठी आश्रमशाळांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

### आदिवासी विकास विभाग आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार योजना

मुंबई : राज्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यासाठी २ योजना सुरु करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत या २ योजना राबविण्यात येतील. यातील पहिल्या योजनेत राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या धर्तीवर स्वयंरोजगारासाठी प्रवासी वाहन, मिनी ट्रक, ट्रक व ट्रॅक्टर, मालवाहू इलेक्ट्रिक रिक्षा त्याचप्रमाणे कृषी संलग्न व्यवसाय, ऑटोमोबाईल, हॉटेल, धाबा सुरु करण्यासाठी ५ लाखांपर्यत कर्ज दिले जाईल. यावरील व्याजदर एनएसटीएफडीसी यांनी निश्चित केल्याप्रमाणे राहील. दुसऱ्या योजनेत पुढील ३ वर्षात ६० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात येऊन त्यामधून एकूण १८ हजार आदिवासी लाभार्थींना लाभ देण्यात येईल.

### शालेय शिक्षण खासगी मान्यताप्राप्त शाळांतील कर्मचाऱ्यांना आश्वसित प्रगती योजना

मुंबई : राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील कर्मचाऱ्यांना आश्वसित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासाठी लागणाऱ्या ५३ कोटी ८६ लाख खर्चास देखील मान्यता देण्यात आली. अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९९४ पासून कालबद्ध पदोन्नती देण्यात येते. राज्य शासनाने १ ऑक्टोबर २००६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. याच धर्तीवर या शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील २ लाभांची ही योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू करण्यात येईल.

### वस्त्रोद्योग विभाग यंत्रमागांना अतिरिक्त वीज सवलत लागू

मुंबई : यंत्रमागांना अतिरिक्त वीज सवलत लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. २७ एचपी (अश्वशक्ती) पेक्षा जास्त पण २०१ एचीपी पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना प्रति युनिट ७५ पैसे अतिरिक्त वीज सवलत देण्यात येईल. २७ पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना प्रति युनिट १ रुपया अतिरिक्त वीज सलवत लागू करण्यात येईल. ही वीज सवलत २७ एचपी पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमागांना तसेच २७ एचीपी पेक्षा जास्त परंतु २०१ एचपी पेक्षा कमी जोडभार असलेले जे यंत्रमाग वस्त्रोद्योग विभागाकडे नोंदणी करतील व ज्यांना मान्यता मिळेल अशा उद्योगांना लागू राहील. ही सवलत राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ या कालावधीपर्यत लागू असेल.

### नगर विकास विभाग धनगर समाजास नवी मुंबई येथे भूखंड

मुंबई : धनगर समाजास नवी मुंबई येथे भूखंड उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. नवी मुंबई मधील खारघर नोड येथील सेक्टर ५ मधील भूखंड क्र.४६ बी हा ४००० चौ.मी. भूखंड धनगर समाजास देण्यात येईल. सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टा अधिमुल्य आकारून जाहिरातीने भूखंडाचे वाटप करण्यात येते. मात्र याबाबतीत अपवाद करण्यात येऊन इतर मागास बहुजन कल्याण विभागास भाडेपट्टयाने थेट वाटप करण्यात येईल. या विभागाने संबंधित समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संस्थेला हा भूखंड योग्य रक्कम आकारून पोट भाडेपट्टयाने हस्तांतरित करावयाचा आहे. या संदर्भात अभिनव समाज फाऊंडेशन या धनगर समाजासाठी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेने नवी मुंबई येथे भूखंड मिळविण्याबाबत विनंती केली होती.

### जीएसटीमध्ये नवीन ५२२ पदांना मान्यता

मुंबई : वस्तू व सेवा कर विभागात नवीन ५२२ पदांना मान्यता देण्याचा आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. तसेच वस्तू कर व सेवा कर विभागाच्या १२ हजार २५९ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला देखील मान्यता देण्यात आली. नवीन पदांमध्ये ९ पदे अपर राज्य कर आयुक्त, ३० राज्य कर सह आयुक्त, ३६ राज्य कर उपायुक्त, १४३ सहायक राज्य कर आयुक्त, २७५ राज्य कर अधिकारी, २७ राज्य कर निरिक्षक आणि २ स्वीय सहायक लघुलेखक गट-अ अशा पदांचा समावेश आहे. राज्याच्या कर संकलनाचा हिस्सा देशाच्या १५ टक्के आहे. तसेच महसुलामध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. राज्याच्या एकूण महसुलात जीएसटीचा हिस्सा ६८ टक्के असून विभागाची पुनर्रचना करण्याची गरज भासत होती.

### शासकीय दस्तऐवजावर आईचे नाव बंधनकारक

मुंबई : शासकीय दस्तऐवजांमध्ये आईच्या नावाचा समावेश वेगळ्या स्तंभामध्ये न दर्शविता उमेदवाराचे नांव आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नोंदविण्याचे बंधनकारक करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. १ मे, २०२४ रोजी व त्यानंतर जन्मलेल्या सर्व बालकांच्या नावाची नोंद बालकाचे नाव आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात सर्व शैक्षणिक कागदपत्रे, महसूली दस्तऐवज, वेतन चिठ्ठी, सेवापुस्तक, विविध परीक्षांच्या अर्जाचे नमुने इत्यादी शासकीय दस्तऐवजामध्ये बंधनकारक करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने जन्म-मृत्यू नोंदवहीत आवश्यकत्या सुधारणा करुन नोंद घेण्यासाठी केंद्र शासनाशी विचारविनिमय करावा. तसेच केंद्र शासनाकडून याबाबत आदेश प्राप्त झाल्यानंतर जन्म/मृत्यु नोंदवहीत बालकाचे नाव आईचे नाव नंतर वडीलाचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नोंद करण्यास मान्यता देण्यात आली आहे. विवाहित स्त्रियांच्या बाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार त्यांच्या विवाहानंतरचे म्हणजे तिचे नाव नंतर तिच्या पतीचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यात यावी. तसेच स्त्रीला विवाहपूर्वीच्या नावाने मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये नोंदविण्याची मुभा ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. अनाथ व तत्सम अपवादात्मक प्रकरणी मुलांच्या जन्म/मृत्यु दाखल्यात नोंद घेण्याबाबत सुट देण्यात येईल.

### बीडीडी गाळेधारक आणि झोपडीधारक यांना दिलासा मुद्रांक शुल्क कमी करणार

मुंबई : बीडीडी चाळीतील अनिवासी गाळेधारक व झोपडीधारक यांच्या करारनाम्यावर लागणारे मुद्रांक शुल्क कमी करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. हे मुद्रांक शुल्क नाममात्र १ हजार घेण्यात येईल. बीडीडी चाळीतील अनिवासी गाळेधारक तसेच परिसरातील झोपडपट्टीमधील अनिवासी झोपडीधारकांसमवेत करण्यात येणाऱ्या पुनर्विकसित गाळ्यांसाठीच्या तसेच पर्यायी जागेच्या भाडे करारनाम्यांवर आकारावयाचे शुल्क नाममात्र १ हजार रुपये आकारण्यात येईल.

18 TO 24 MARCH 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 3/16/2024 8:16 PM Page 1



# कंपनीकडून खंडणी उकळण्याचा प्रकार हा देशातील सर्वात मोठा स्कॅम इल्क्ट्रोल बाँडमुळेच समोर आला - राहुल गांधी




**भिवंडी/प्रतिनिधी**

राजकीय पक्षांचे अर्थकारण साफ करण्याच्या बाता मारून देशाच्या प्रधानमंत्री यांनी आणलेली इलेक्ट्रॉल बाँड ही संकल्पना राबवली. पण या माध्यमातून देशातील सर्वात मोठा खंडणी उकळण्याचा प्रकार समोर आला आहे असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भिवंडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे. याप्रसंगी काँग्रेसचे जयराम नरेश, विश्वजित कदम, आरिफ नसीम खान, इम्रान प्रतापगढी, जिल्हा ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे आदीं मान्यवर उपस्थित होते. ईडीसीबीआय यांच्या कडून मोठ मोठ्या उद्योगांवर कारवाई होते व त्यानंतर या कंपनी इलेक्ट्रॉल बाँडच्या माध्यमातून भाजपाला निधी देतात. हा प्रकार खंडणी उकळण्याचा प्रकार आहे असा आरोप राहुल गांधी यांनी केला. ईडीसीबीआयकडून दबाव आणून कारवाई होते व त्यांना इलेक्ट्रॉल बाँड खरेदी करण्यास भाग पाडून त्यातून भाजपाने पैसे घेतले. तर मोठ्या उद्योजकांना कॉन्ट्रॅक्ट देतात त्यातून काही हिस्सा अशा उद्योगांकडून भाजपला इलेक्ट्रॉल बाँडच्या रुपात मिळाला आहे. देशातील सर्वात मोठा भ्रष्टाचार नरेंद्र मोदी यांनी केला आहे. सीबीआयईडी चौकशी नाही करत तर भाजपासाठी खंडणी उकळण्यासाठी काम करीत आहेत. भाजपाने सर्व यंत्रणांना आपल्या काबूत करून ठेवले आहे हे राष्ट्र विघातक काम भाजपा करीत आहे. सीबीआयचा दबाव टाकून पक्ष फोडले जातात. काँग्रेस पक्ष मजबूत आहे. महाराष्ट्रात शिवसेना राष्ट्रवादी यांना भाजपाने याच भ्रष्ट मार्गाने जमवलेल्या पैशाने तोडले आहे. पण तरी महाराष्ट्रात महाविकास आघाडी जिंकणार आहे असे सांगत सीबीआयईडी या संस्था भाजपाचे हत्यार आहे भविष्यात काँग्रेस पक्षाला निधी देणाऱ्या कंपनीवर कारवाई होऊ शकते अशी शक्यता नाकारता येणार नाही असे वक्तव्य करीत पण लक्षात ठेवावे की एक दिवस भाजपा हरेल असा विश्वास शेवटी राहुल गांधी यांनी व्यक्त केला.

# भिवंडीत स्वच्छ भारत अभियानाचा बोजवारा; शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य, नागरिक हैराण



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरात कचऱ्याची समस्या गंभीर बसली आहे. शहरात मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर तसेच शहरातील अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. कचरा ठेकेदाराचा ठेका रद्द झाल्याने महापालिकेने नवीन कचरा उचलण्यासाठी ऑनलाइन टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे मात्र ठेकेदार नियुक्त झाला नसल्याने शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले आहेत. भिवंडी शहर संवेदनशील शहर असून मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने शहरात राहत आहेत. मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना मंगळवार पासून सुरू झाला आहे मात्र अनेक मुस्लिम वस्त्यांमध्ये कचऱ्याचे ढीग साचले असल्याने मुस्लिम बांधवांमध्ये मनपा प्रशासना विरोधात तीव्र संताप पसरला आहे. शहरातील चाविंद्रा डम्पिंग ग्राउंडबरोबरच शहराच्या मध्यभागी असलेल्या खडक रोड परिसरात सुरू केलेला डंपिंग ग्राउंडची समस्या अत्यंत गंभीर बनली असून खडक रोड परिसरातील डम्पिंग ग्राउंड नागरी वस्तीच्या मधोमध आहे. येथे कचरा संकलन होत असल्याने आजूबाजूच्या नागरिकांना प्रचंड दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.त्यातच आता या डंपिंग ग्राउंडला आगी लग्नाच्या घटना शहरात रोज घडत आहेत त्यामुळे खडक रोड डम्पिंग ग्राउंड वर आग लागली की आजूबाजूच्या परिसरात उग्र धुर व उग्र दर्पाने नागरिक हैराण होत आहेत. विशेष म्हणजे शहरातील कचरा उचलण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र काही लोकप्रतिनिधी कचरा उचलून देत नाहीत, जर मनपा प्रशासनाने खाजगी वाहनातून कचरा उचलला तर कचरा उचलणाऱ्या कंत्राटी ठेकेदारांच्या गाड्या फोडल्या जातील असा दम काही लोकप्रतिनिधींनी भरला असल्याने शहरात कचरा उचलला जात नसल्याची चर्चा मनपा प्रशासनात सुरू आहे. एकीकडे कचरा समस्या तर दुसरीकडे लोकप्रतिनिधींनी कचरा उचलण्यास केलेली अडकाठी यामुळे ऐन रमझान सणात मनपा प्रशासन प्रचंड अडचणीत आले असून मनपा आयुक्त अजय वैद्य यातून कसा मार्ग काढणार हे पाहणे गरजेचे आहे.

# आय.टी.इन्होव्हेटिव प्रयोगशाळा व करिअर फाऊंडेशन लर्निंग सेंटरचे वाडा येथे उद्घाटन



**वाडा/प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या सर्वसमावेशकतेकडे महत्त्वाकांक्षी वाटचालीत, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे द्वारे रोबोटिक्स, 3D प्रिंटिंग आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) मधील महत्त्वपूर्ण लॅब कोर्सेस तसेच जेईई, नीट स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठीच्या अग्रगण्य उपक्रमाचे वाडा येथील पी. जे हायस्कूल येथे शनिवारी ०९ मार्च रोजी योगेश महानसरिया यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाले. पालघर जिल्ह्यातील या दुसऱ्या लॅबमुळे ग्रामीण-शहरी भागातील तंत्रज्ञानातील अंतर भरून काढणे, अत्याधुनिक ज्ञान आणि कौशल्यांमध्ये समान प्रवेश प्रदान करणे शक्य होणार आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञानाची क्षमता आणि आवश्यकता ओळखून रोबोटिक्स, थ्री डी प्रिंटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT) हे अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ डिजिटल युगाशी जुळवून घेण्याचेच नव्हे तर तांत्रिक प्रगतीमध्ये सक्रिय योगदान देणारे बनण्याची क्षमता प्राप्त होईल. अत्याधुनिक उपकरणे, तज्ञ मार्गदर्शक आणि प्रात्यक्षिकासह शिकण्याचे ...पान ६ वर

# सप्तफेरे सेवाभावी संस्था व सप्तफेरे वधू वर सुचक केंद्राचा गुणगौरव सोहळा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

सप्तफेरे सेवाभावी संस्था व सप्तफेरे वधू-वर सूचक केंद्राच्यावतीने सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेवून त्यांच्या कार्याचा पाठपुरावा करून अशा व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो. अशाच प्रकारचा सन्मान सोहळा ते गेल्या १२ वर्षापासून करत आहेत. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात हा कार्यक्रम सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिध्द प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठल लहाने यांची उपस्थिती होती तर उद्घाटक म्हणून आरसीसीचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर तर प्रमुख पाहुणे म्हणून दापका ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा माजी सभापती व्यंकटराव पाटील दापकेकर, वृक्षासाठी आपले आयुष्य अर्पण करणारे सुपर्ण जगताप व टाईम्स नाऊचे जिल्हा प्रतिनिधी शशिकांत पाटील यांची तर लातूरातील सुप्रसिध्द उद्योजक द्वारकादास शामकुमारचे मालक तुकाराम पाटील, बांधकाम व्यवसायिक नागनाथ गिते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संजय राजुळे म्हणाले की, आपण आपल्या कमाईचा एक हिस्सा समाजातील सामाजिक कार्य करणार्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करतोत आणि तो माझा छंद आहे. मी माझे हे कार्य असेच पुढेही चालूच ठेवणार असुन समाजातील चांगल्या व्यक्तींचा सन्मान केल्याने त्या व्यक्तींना प्रेरणा भेटते व अशाच प्रकारचे कार्य मी गेल्या २००५ पासून करत आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विठ्ठल लहाने यांनी सज्जनांचे संगोपन करायला हवे असे ठासून सांगत उत्तम चारित्र्य, संस्कारमय जीवन व ...पान ६ वर

# केशवसृष्टी ग्राम विकास योजनेअंतर्गत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त महिला समन्वयाच्या माध्यमातून देशभर होणाऱ्या महिला दिनाचे औचित्य साधून केशवसृष्टि ग्राम विकास योजने अंतर्गत वाडा, परळी, विक्रमगड, जव्हार, खोडाळा व कासा या सहा केंद्रांतील २० संकुलामध्ये जागतिक महिला दिना निमीत्त महिला संमेलन दिन साजरा करण्यात आला. या सर्व २० कार्यक्रमात १६३ गावातील महिलांची सुमारे ९८०० इतकी उपस्थिती होती. हळदी कुंकू कार्यक्रमाच्या माध्यमातून संमेलनामध्ये भाग घेणाऱ्या महिला स्वतःच्या तसेच त्यांचा परिवार, समाज, आणि राष्ट्राचे चिंतन, भारतीय दृष्टिकोनातून करतील असा उद्देश यामध्ये आहे. प्रत्येक क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांचा मानसन्मान राखून त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करण्याचा व्यापक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. महिला संमेलना ...पान ६ वर

# मराठा सेवा संघातर्फे महिला दिनानिमीत्त जिल्हा परिषदेतील सर्व महिलांचा सन्मान



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील महिलांसाठी हिरकणी कक्ष, जेवणाला बसण्यासाठी कँटीन, त्यांच्या लहान मुलांना बसणे व खेळण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी सांगितले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांच्यासह सर्व महिला कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मराठा सेवा संघातर्फे महिला दिनानिमीत्त जिल्हा परिषदेतील सर्व महिलांचा सन्मान मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यामध्ये रूपाली रोकडे, अश्विनी सातपुते, सुनिता भुसारे, नम्रता मिट्ठा, श्रीदेवी महामुरे, रजनी केकडे, प्रतिक्षा कांबळे, श्रद्धा गायकवाड, ज्योती माळी, अरूणा रांजने, ज्योती काटकर, प्रज्ञा कुलकर्णी, सुजाता कांबळे, ममता काशेट्टी, वैशाली रंपुरे, राजश्री रोजी, वैशाली शिंदे, स्मिता पोरेडी, पुजा हुच्चे, छाया क्षीरसागर, अर्चना निराळी, अनिता तुपारे, राणी तवटी, उषा भोसले,फरजाना शेख, रितू शिंदे, अश्विनी दोरकर, शशिकला म्हेत्रे, सुचिता जाधव, ज्योसना साठे, भारती उमराणी, अंजना बनसोडे, कविता कांबळे, सविता मिसाळ, अंबिका वाघमोडे, राजश्री कांगरे, महानंदा कुंभार, वर्षा औदुर्ती, सुमित्रा पुजारी, अनुपमा पडवळे, केशर टोनपे, मेघा सोळंके, सविता चव्हाण, राजश्री कोळी, सरस्वती व्हनसुरे, आरती माढेकर, शबाना जमादार, सनाबेगम करजगी, सुवर्णा पंगुडवाले, अंजली पेठकर, जयश्री पाटील, गायत्री काळे, संगीता काळे, स्नेहलता जाधव, आयशा बिराजदार, स्वाती स्वामी, गोदावरी राठोड, दौलाबेगम शेख, सोनाली केत, अमिता वसेकर, रेणुका कल्याणशेट्टी, मनिषा गवळी, सिमा लोखंडे, चन्नबसव्वा कल्याण, सुरेखा सुपाते, प्रमिला बचुटे, संगीता सुलगुडले, निर्मला राठोड, रूपाली मोरे, विद्या हैनाळकर, रीमा पवार, भारती चव्हाण, ...पान ६ वर

# बाभळगाव परिसरातील शेत रस्त्याच्या कामाचे आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन



**लातूर/प्रतिनिधी**

बाभळगाव ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये १३ किलोमीटर शेतरस्ते करण्यात येणार आहेत. या शेतरस्त्यामुळे प्रत्येकाला शेताकडे जाण्यासाठी बारमाही रस्ता उपलब्ध होईल, या रस्त्याचे काम दर्जेदार गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. बाभळगाव परिसरातील एकूण १३ किलोमीटर शेत रस्त्यांच्या कामाला मंजुरी मिळाली आहे, गुरुवार दि. १४ मार्च रोजी बाभळगाव परिसरातील शारदा पांडुरंग बदामे ते युवराज थडकर यांच्या शेतापर्यंतच्या शेतरस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख, तहसीलदार सौदागर तांदळे, सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, मनरेगाचे अभियंता सुनील श्रणगारे, लातूर पंचायत समितीचे अधिकारी मुक्तापुरे, ग्रामसेवक अनंत मडके, तलाठी गोविंद तावरे, रामदास पवार, सचिन मस्के, पोलीस पाटील मुक्ताराम पिटले आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी बाभळगाव ग्रामस्थ उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी म्हणाले की, बाभळगाव ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये १३ किलोमीटर शेतरस्ते सर्वांच्या विनंतीने करण्यात येणार आहेत.

लातूरचे तहसीलदार व त्यांच्या टीमची हे रस्ते मोकळे करण्यात महत्त्वाची भूमिका असणार आहे. या रस्त्यामध्ये कुठलाही वाद नसावा अशी अपेक्षा मी बाळगतो असे सांगून प्रत्येकाला शेताकडे जाण्यासाठी बारमाही रस्ता उपलब्ध होईल, या रस्त्याचे काम दर्जेदार गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज थडकर यांनी केले तर शेवटी आभार बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख यांनी मानले.

# स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून भावी कलाकार निर्माण होतात - गणेश दादा हाके पाटील




**अहमदपूर/फिरोज शेख**

मानवी जीवनामध्ये केलेला असाधारण महत्त्व असल्याचे सांगून कलेमुळे माणूस लोकप्रिय होतो आणि त्याचे खरे संस्कार शालेय व महाविद्यालयातील स्नेहसंमेलनातून होतात म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात अग्रक्रमाने सहभागी व्हावे असे आग्रही प्रतिपादन भाजपा प्रदेशाचे प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील यांनी केले. संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना व्यक्त केले. या समयी उद्घाटक म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाच्या सचिव रेखाताई हाके पाटील, भाजपाचे जिल्हा चिटणीस ॲडव्होकेट भारत चामे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, ओबीसीचे सरचिटणीस ज्ञानोबा बडगिरे, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. हनुमंत देवकते, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश पुणे, संस्थेचे उपाध्यक्ष एडवोकेट मानसी हाके, कुलदीपभैय्या हाके, ...पान ६ वर

# राहुल गांधी यांचे वाड्यात जल्लोषात स्वागत



**वाडा/प्रतिनिधी**

काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज, शुक्रवारी वाडा येथे दाखल झाली होती. दुपारच्या सुमारास राहुल गांधी यांचे आगमन झाले तेंव्हा त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यांच्या स्वागतासाठी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली होती तर खंडेश्वरी नाका येथे त्यांच्या भाषणासाठी भव्य स्टेज उभारले होते. मात्र त्यांनी सुरक्षेच्या कारणास्तव ओपन गाडीतूनच नागरिकांशी संवाद साधाला. यावेळी ते बोलताना म्हणाले की, तुम्ही तुमच्या हक्कासाठी बोलणे आणि लढणे शिका, काँग्रेस सत्तेत आल्यावर प्रत्येक गृहिणीला एक लाख रुपये वार्षिक देऊन देशातून गरिबी हद्दपार करणार. तर आदिवासी बांधवांना त्यांच्या ताब्यात असलेले वनपट्टे सहा महिन्यातच त्यांच्या नावे करून देणार. या यात्रेच्या अनुषंगाने कायदा आणि सुव्यवस्थेच्या ...पान ६ वर

# शेतकरी संघटनेच्या मराठवाडा अध्यक्षपदी आनंद जीवने यांची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

लातूर येथील अंजनी हॉटेलमध्ये ११ मार्च रोजी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारणी मराठवाडा कार्यकारणी व जिल्हा कार्यकारीणी बैठक होऊन सर्वानुमते पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आले यात आनंद जीवने यांची मराठवाडा अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली व मराठवाडा संपर्क प्रमुख म्हणून महादेव कोठे यांचे निवड करण्यात आली आहे. तसेच जिल्हा उपाध्यक्ष म्हणून श्रीमंत अण्णा लुले तर योगेश तगरखेडे यांची जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून, देवणी तालुका अध्यक्ष दत्ता अर्जुने, तालुका संघटक शंकर बावचे, कार्याध्यक्ष बालाजी लासुने, जिल्हा सरचिटणीस पप्पू सावंत, करीम भाई शेख यांची देवणी तालुका उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट व महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे व तसेच मार्गदर्शक दगडू पडले यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले या बैठकीस सूत्रसंचालन दत्तात्रय लोभे यांनी केले, तर जिल्हाध्यक्ष यांनी आभार मानले या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून व लातूर जिल्ह्यातून संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.